## प्रकरण सहावे

## ` मराठी अध्यापनपध्दती ` चे अध्ययन करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांच्या समस्या

### ` अ ` विभाग

पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय असलेल्या व मराठी अध्यापनपध्दती निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या समस्या


६.१ प्रास्ताविक

६.२ प्रश्नावली भरुन देणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांची सर्वसाधारण माहिती.

६.३ बी.एड्. अभ्यासक्रमासाठी मराठी अध्यापनपध्दती निवडण्याची कारणे.

६.४ मराठी अध्यापनपध्दतीचे अध्ययन करताना उद्भवणाऱ्या अडचणी.

६.५ पाठाचे टाचण काढताना येणाऱ्या अडचणी.

६.६ पाठ घेताना येणाऱ्या अडचणी.

६.७ मराठीचा पाठ निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी.

६.८ मराठीच्या अध्यापनपध्दती या विषयाच्या अध्ययनाशी निगडित बाबी.

६.९ मराठी अध्यापनपध्दतीचे अध्ययन-अध्यापन प्रभावी होण्यासाठी अभ्यासपूरक उपक्रम.

६.१० प्रस्तुत संशोधनास उपयुक्त अशी अन्य माहिती.

## `ब` विभाग

पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेला मराठी प्रमुख विषय नसलेल्या तरीही बी.एड्.ला मराठी अध्यापन-पध्दती निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या समस्यांचा अभ्यास


६.११ प्रास्ताविक.

६.१२ सर्वसाधारण माहिती.

६.१३ पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेस मराठी हा मुख्य विषय नसूनही बी.एड्. परीक्षेसाठी मराठी अध्यापनपध्दती निवडण्याची कारणे.

६.१४ मराठीच्या अध्यापनपध्दतीचे अध्ययन करताना उद्भवणाऱ्या अडचणी.

६.१५ `मराठीची अध्यापनपध्दती` या विषयाच्या अध्ययनाशी निगडित गोष्टी.

६.१६ पाठ टाचण करताना येणाऱ्या अडचणी.

६.१७ पाठ घेताना येणाऱ्या अडचणी.

६.१८ मराठीचा पाठ निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी.

६.१९ प्रस्तुत संशोधनास उपयुक्त अशी अन्य माहिती.

६.२० समारोप.

## `अ` विभाग

पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय असलेल्या व मराठी अध्यापनपध्दती निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या समस्यांचा अभ्यास

### ६.१ प्रास्ताविक :

प्रकरण पाचमध्ये `अ` आणि `ब` या विभागात मराठी अध्यापनपध्दतीचे अध्यापन करणाऱ्या अध्यापकांच्या समस्यांचे आणि मराठी पाठांचे निरीक्षण करणाऱ्या अध्यापकांच्या समस्यांचे वर्गीकरण, विश्लेषण करून अन्वयार्थ लावला. प्रस्तुतच्या ६ व्या प्रकरणातील `अ` विभागात `पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय असलेल्या व मराठी अध्यापनपध्दती निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या समस्यांचे वर्गीकरण, विश्लेषण करून अन्वयार्थ लावलेला आहे.

### ६.२ प्रश्नावली भरून देणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांची सर्वसाधारण माहिती :

प्रश्नावलीच्या दुसऱ्या प्रश्नामध्ये प्रशिक्षणार्थींच्या शैक्षणिक पात्रतेबाबत विचारणा केलेली होती. अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी किमान पदवीधर असावा लागतो. आणि मराठी अध्यापनपध्दती निवडताना तो प्रशिक्षणार्थी पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय असणारा पाहिजे. सारणी क्र. ६.१ मध्ये सदरच्या प्रशिक्षणार्थ्यांची शैक्षणिक पात्रता स्पष्ट होते.

सारणी क्र. ६.१

प्रशिक्षणार्थ्यांची शैक्षणिक पात्रता

| पदवीधर | पदव्युत्तर | एकूण |
|---|---|---|
| ११ | २२ | ३३ |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की, ३३ प्रशिक्षणार्थ्यांपैकी २२ जणा पदव्युत्तर परीक्षेला मराठी प्रमुख विषय असलेले तर ११ जणा पदवी परीक्षेला मराठी प्रमुख विषय असलेले आहेत.

६.३ बी.एड्. अभ्यासक्रमासाठी मराठी
अध्यापनपध्दती निवडण्याची कारणे :

प्रश्नावलीच्या प्रश्न क्र. ४ मध्ये बी.एड्. अभ्यासक्रमासाठी मराठी अध्यापन-पध्दती निवडण्याची कारणे कोणती अशी विचारणा केलेली होती आणि दिलेल्या कारणांच्यापुढे संमतीदर्शक अशी (✓) बरोबर खूण करावयास सांगितली होती. या प्रश्नामधून मिळालेली माहिती सारणी क्रमांक ६.२ मध्ये नमूद केलेली आहे.

सारणी क्र. ६.२

मराठी अध्यापनपध्दती निवडीची कारणे

| अनुक्रम | मराठी अध्यापनपध्दती निवडण्याची कारणे | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या होय | नाही |
|---|---|---|---|
| १) | मराठी अध्यापनपध्दतीची आवड आहे. | ३३ | ० |
| २) | मराठी अध्यापनपध्दती अभ्यासास सोपी आहे. | २१ | १२ |
| ३) | मातृभाषा म्हणून निवड केली. | ३२ | १ |
| ४) | शासकीय भाषा म्हणून मराठीस असलेले महत्व लक्षात घेतले. | २८ | ५ |
| ५) | मराठी अध्ययनास सोपी आहे. | २० | १३ |
| ६) | नोकरी मिळण्यास सहाय्यक अशी ही अध्यापनपध्दती आहे. | २६ | ७ |
| ७) | ही पध्दती कमी तयारीची व कमी साधनांची आहे. | १९ | १४ |
| ८) | अन्य महत्वाच्या अध्यापनपध्दती मिळाल्या नाहीत म्हणून. | १८ | १५ |

| अनुक्रम | मराठी अध्यापनपध्दती निवडण्याची कारणे | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या होय | नाही |
|---|---|---|---|
| ९) | महाराष्ट्र राज्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात मराठीस स्थान मिळेल म्हणून. | २५ | ८ |
| १०) | अध्यापक महाविद्यालयाने या अध्यापन-पध्दतीची सक्ती केली म्हणून. | ० | ३३ |

सारणी क्र. ६.३

मराठी अध्यापनपध्दतीच्या निवडीची कारणे
(प्रतिसादानुसार उतरत्या श्रेणीनुसार)

| अनुक्रम | मराठी अध्यापनपध्दती निवडण्याची कारणे | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या होय | नाही |
|---|---|---|---|
| १) | मराठी अध्यापन पध्दतीची आवड आहे. | ३३ | ० |
| २) | मातृभाषा म्हणून निवड केली. | ३२ | १ |
| ३) | शासकीय भाषा म्हणून मराठीस आलेले महत्त्व लक्षात घेतले. | २८ | ५ |
| ४) | नोकरी मिळण्यास सहाय्यक अशी ही अध्यापनपध्दती आहे. | २६ | ७ |
| ५) | महाराष्ट्र राज्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात मराठीस स्थान मिळेल म्हणून. | २५ | ८ |
| ६) | मराठी अध्यापनपध्दती अभ्यासास सोपी आहे. | २१ | १२ |
| ७) | मराठी अध्ययनास सोपी आहे. | २० | १३ |

| अनुक्रम | मराठी अध्यापनपध्दती निवडण्याची कारणे | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ८) | ही पध्दती कमी तयारीची व कमी साधनांचीआहे. | १९ | १४ |
| ९) | अन्य महत्वाच्या अध्यापनपध्दती मिळाल्या नाहीत म्हणून. | १८ | १५ |
| १०) | अध्यापक महाविद्यालयाने या अध्यापनपध्दतीची सक्ती केली म्हणून. | ० | ३३ |

याच प्रश्नाच्या उत्तरार्धात आणखी काही कारणे असल्यास ती नमूद करावयास सांगितलेली होती. नमूद झालेली कारणे खालीलप्रमाणे आहेत :

१) लेखनाची आवड आहे.
२) मराठीचे पूर्ण ज्ञान जाणून घेऊन ते प्रभावी शैलीने शिकविता यावे ही इच्छा आहे.
३) पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय आहे. बी.एड्.ला सुध्दा तो विषय असावा म्हणून.
४) मातृभाषा सर्व विषयांचे माध्यम आहे म्हणून.
५) अध्यापनपध्दती मिळाली म्हणून.
६) भाषा शिकविणे कळावे म्हणून.
७) इतर भाषा अवघड आहेत म्हणून.
८) विषयज्ञान कसे शिकवावे हे कळावे म्हणून.
९) सखोल ज्ञान मिळावे म्हणून.

सारणी क्र. ६. ३ मधील कारण क्र. १ मराठी अध्यापनपध्दतीची आवड आहे तसेच कारण क्र. २ मातृभाषा म्हणून निवड केली ही दोन कारणे मराठी अध्यापनपध्दतीची निवड का केली या प्रश्नाची संयुक्तिक कारणे आहेत.

कारण क्र. ३ शासकीय भाषा म्हणून मराठीस आलेले महत्त्व लक्षात घेतले हे कारण पटणारे नाही.

कारण क्र. ४ नोकरी मिळण्यास सहाय्यक अशी ही अध्यापनपध्दती आहे. प्रत्यक्ष स्थिती पाहता आणि पूर्वीच मराठीचे अध्यापक भरपूर असता या कारणाशी सहमत होणे कठीण आहे.

कारण क्र. ५ महाराष्ट्र राज्याच्या रौप्य महोत्सवी वर्षात मराठीस स्थान मिळेल म्हणून, हे कारण नैमित्तिक, अपुरे व न पटणारे आहे.

कारण क्र. ६ मराठी अध्यापनपध्दती अभ्यासास सोपी आहे. मराठीचे सूक्ष्म भाषाविशेष पाहता ही अध्यापनपध्दती अवघड आहे. सबब हे कारण योग्य वाटत नाही.

कारण क्र. ७ मराठी अध्ययनास सोपी आहे. मराठी अध्यापनपध्दती सोपी नाही. तिचे स्वरूप फार व्यापक आहे. म्हणून हे कारण पटणारे नाही.

कारण क्र. ८ ही पध्दती कमी तयारीची व कमी साधनांची आहे, वास्तविक मराठीत भावना, कल्पना, स्पष्ट करताना आशयांश तयारी खूप करावी लागते. तसेच चित्रे, तक्ते इत्यादी साधनांचा वापर करावा लागतो. सबब हे कारण पटणारे नाही.

कारण क्र. ९ अन्य महत्त्वाच्या अध्यापनपध्दती मिळाल्या नाहीत म्हणून. मराठी ही अध्यापनपध्दती महत्त्वाची वाटत नाही. नाईलाज म्हणून वा पर्याय नाही म्हणून मराठी अध्यापनपध्दती घेतली हे कारण उचित नाही.

<u>अन्य कारणे</u> :

वरील कारणांव्यतिरिक्त अन्य कारणे नोंदविली गेली आहेत. त्यापैकी कारण क्रमांक २ मराठीचे पूर्ण ज्ञान जाणून घेऊन ते प्रभावी शैलीने शिकविता यावे ही इच्छा आहे हे कारण योग्य आहे. या कारणातून मराठी अध्यापनाबाबतची आवड स्पष्ट होते.

कारण क्र. ३ बी.ए., एम्.ए. परीक्षेस मुख्य विषय मराठी आहे. बी.एड्.ला सुध्दा तो विषय असावा हे कारण रास्त व सयुक्तिक आहे.

कारण क्र. ४ मातृभाषा सर्व विषयांचे माध्यम आहे म्हणून हे कारण योग्य आहे.

कारण क्र. ६ भाषा शिकविणे कळावे म्हणून. हे कारण रास्त आहे.

कारण क्र. ८ विषयज्ञान कसे शिकवावे हे कळावे म्हणून. या कारणामागे विषयज्ञानाच्या अध्यापनाचे महत्त्व स्पष्ट होते.

कारण क्र. १ लेखनाची आवड आहे हे कारण पटत नाही. त्यासाठी मराठी अध्यापनपध्दती निवडण्याचे कारण नाही.

कारण क्र. ५ अध्यापनपध्दती मिळाली म्हणून, हे कारण मराठी अध्यापनपध्दतीच्या निवडीचे योग्य कारण वाटत नाही.

इतरभाषा अवघड आहेत हे ७ नंबरचे कारण पटत नाही. मराठी भाषासुध्दा बारकावे असलेली आहे. इतर भाषा अवघड आहेत म्हणजे मराठी भाषा सोपी आहे, हे कारण योग्य नाही.

सखोल ज्ञान मिळावे हे कारण क्र. ९ चे विधान पटत नाही. मराठी भाषेचे सखोल ज्ञान मिळण्यासाठी बी.एड्, एम्.ए. परीक्षेस मराठी मुख्य विषय घेतला की पुरेसे आहे.

## ६.४ मराठी अध्यापनपध्दतीचे अध्ययन करताना उद्‌भवणाऱ्या अडचणी :

प्रश्नावलीच्या 'क' विभागात मराठी अध्यापनपध्दतीचे अध्ययन करताना उद्‌भवणाऱ्या अडचणी कोणत्या या बाबत विचारणा केली होती आणि दिलेल्या अडचणींच्या यादीपुढे सहमतीदर्शक खूण (✓) करावयास सांगितली होती. या प्रश्नाद्वारे मिळालेली माहिती सारणी क्रमांक ६.४ मधून स्पष्ट होते.

सारणी क्र. ६.४

मराठी अध्यापनपध्दतीचे अध्ययन करताना उद्भवणाऱ्या अडचणी

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | ही पध्दती शिकविण्यासाठी असलेल्या तासिका अपुऱ्या वाटतात. | ३३ | ० |
| २) | महाविद्यालयीन वेळ गैरसोयीची वाटते. | १७ | १६ |
| ३) | प्रस्तुतचा अभ्यासक्रम बोजड, रटाळ, रुचिहीन आहे. | २२ | ११ |
| ४) | वर्गात स्वत:ची उपस्थिती सतत ठेवण्यात अनेक अडथळे येतात. | १७ | १६ |
| ५) | स्वत:चा कमी बौध्दिक दर्जा आहे असे जाणवते. | २१ | १२ |
| ६) | मराठी ही अध्यापनपध्दती फार सोपी हा गैरसमज पक्का झाला आहे. पूर्वीचे मराठीबद्दलचे अध्ययन अपुरे आहे असे जाणवते. | २४ | ९ |
| ७) | पाठ्यांशाचे प्रकट वाचन प्रभावी करता येत नाही. | २० | १३ |
| ८) | नवीन पारिभाषिक शब्द स्वत:स चटकन् कळत नाहीत. | २८ | ५ |
| ९) | परिपूर्ण असे विषयज्ञान समाधानकारक मिळालेले नसते. | २७ | ६ |
| १०) | नवीन संदर्भ ग्रंथ, पूरक ग्रंथ, दृकश्राव्य साधने, अध्यापनपध्दतीवरचे ग्रंथ सहजासहजी व वेळेत उपलब्ध होत नाहीत. | २९ | ४ |
| ११) | प्राध्यापकांची अध्यापन तयारी अपुरी आहे असे जाणवते. त्यांचे अध्यापन दर्जेदार व प्रभावी वाटत नाही. | १९ | १४ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १२) | या अध्यापनपध्दती नवीन वाटतात, स्तर व दर्जामुळे स्थितीत फरक पडतो. | २३ | १० |
| १३) | प्राध्यापकांना प्रशिक्षणार्थ्यांचे शंका निरसन अध्यापनपध्दतींच्या संदर्भात करण्यास वेळ अपुरा पडतो. | २९ | ४ |
| १४) | मापिक कौशल्ये व उद्दिष्टांचे ज्ञान प्रशिक्षणार्थ्यांना स्पष्ट परिचित करून दिलेले नसते. | २५ | ८ |
| १५) | पाठ मार्गदर्शक, पाठ निरीक्षक व अध्यापन-पध्दती शिकविणाऱ्यांच्या कार्यात सुसंगती जाणवत नाही. | ३२ | १ |
| १६) | प्राध्यापकांचे सांस्कृतिक कार्यक्रमांच्या अति-व्यापामुळे अध्यापनाकडे पूर्ण लक्ष राहू शकत नाही. | २३ | १० |
| १७) | प्रशिक्षणार्थ्यांचा बराच वेळ सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अती व्यापात जातो. | ३० | ३ |
| १८) | मुद्दे कसे टिपावेत हे कळत नाही. | २८ | ५ |

वरील सारणीवरून असे स्पष्ट होते की सर्वच अडचणी पन्नास टक्क्यांहून अधिक प्रशिक्षणार्थ्यांना मान्य आहेत. म्हणजेच या अडचणींना ३३ पैकी १७ हून अधिक प्रशिक्षणार्थ्यांनी सहमती दिल्याने ह्या अडचणी बहुसंख्यांकांना प्रकर्षाने जाणवणाऱ्या आणि खऱ्या वाटतात. विद्यार्थ्यांच्या प्रतिसादानुसार या अडचणी क्रमानुसार पुढीलप्रमाणे लावता येतील.

सारणी क्र. ६५

मराठी अध्यापनपध्दतीचे अध्ययन करणा-या प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रतिसादानुसार अडचणी (उतरत्या श्रेणीनुसार)

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | ही पध्दती शिकविण्यासाठी तासिका अपु-या वाटतात. | ३३ | - |
| २) | पाठमार्गदर्शक, पाठनिरीक्षक व अध्यापन-पध्दती शिकविणा-यांच्या कार्यात सुसंगती जाणवत नाही. | ३२ | १ |
| ३) | प्रशिक्षणार्थ्यांचा बराच वेळ सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अती व्यापात जातो. | ३० | ३ |
| ४) | नवीन संदर्भ ग्रंथ, पूरक ग्रंथ, दृक्श्राव्य साधने, अध्यापन पध्दतीवरचे ग्रंथ सहजासहजी व वेळेत उपलब्ध होत नाहीत. | २९ | ४ |
| ५) | प्राध्यापकांना, प्रशिक्षणार्थ्यांचे शंका निरसन अध्यापनपध्दतीच्या संदर्भात करण्यास वेळ अपुरा पडतो. | २९ | ४ |
| ६) | नवीन पारिभाषिक शब्द स्वत:स चटकन् कळत नाहीत. | २८ | ५ |
| ७) | मुद्दे कसे टिपावेत हे कळत नाही. | २८ | ५ |
| ८) | परिपूर्ण असे विषयज्ञान समाधानकारक मिळालेले नसते. | २७ | ६ |
| ९) | भाषिक कौशल्ये व उद्दिष्टांचे ज्ञान प्रशिक्षणार्थ्यांना स्पष्ट परिचित करून दिलेले नसते. | २५ | ८ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १०) | मराठी ही अध्यापनपध्दती फार सोपी हा गैरसमज पक्का झाला आहे. पूर्वीचे मराठी-बद्दलचे अध्ययन अपुरे आहे असे जाणवते. | २४ | ९ |
| ११) | या अध्यापनपध्दती नवीन वाटतात. स्तर व दर्जामुळे स्थितीत फरक पडतो. | २३ | १० |
| १२) | प्राध्यापकांचे सांस्कृतिक कार्यक्रमांच्या अती व्यापामुळे अध्यापनाकडे पूर्ण लक्ष राहू शकत नाही. | २३ | १० |
| १३) | प्रस्तुतचा अभ्यासक्रम बोजड, रटाळ, रुचिहीन आहे. | २२ | ११ |
| १४) | स्वत:चा कमी बौध्दिक दर्जा आहे असे जाणवते. | २१ | १२ |
| १५) | पाठ्यांशाचे प्रकट वाचन प्रभावी करता येत नाही. | २० | १३ |
| १६) | प्राध्यापकांची अध्यापन तयारी अपुरी आहे असे जाणवते. त्यांचे अध्यापन दर्जेदार व प्रभावी वाटत नाही. | १९ | १४ |
| १७) | वर्गात स्वत:ची उपस्थिती सतत ठेवण्यात अनेक अडथळे येतात. | १७ | १६ |
| १८) | महाविद्यालयीन वेळ गैरसोईची वाटते. | १७ | १६ |

याच प्रश्नाच्या उत्तरार्धात आणखी काही अडचणी असल्यास त्या नमूद करावयास सांगितलेल्या होत्या. त्या अडचणी खाली नोंदविलेल्या आहेत.

१) मराठी अध्यापनास एकापेक्षा अधिक प्राध्यापकांची आवश्यकता आहे.

२) विषयज्ञान पूर्ण नीट घेतले जात नाही.

३) अध्यापनातील बारकाव्यांना बगल मिळते.

वरील तीनही अडचणी रास्त व नवीन आहेत.

या अडचणींच्या संदर्भात त्यांचे निवारण करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यास सांगितले होते. सुचविले गेलेले उपाय खाली नमूद केलेले आहेत :

१) अध्यापनाचे विशेषत: विषयज्ञानाचे तास वाढवावेत.

२) साधने तत्परतेने अध्यापनाच्यावेळी वापरावीत.

३) अध्यापनातील अध्यापकांचे मतभेद एका व्यासपीठावर दूर व्हावेत.

४) शुध्दलेखनाबाबत अध्यापनात भर हवा.

५) मराठी अध्यापन पध्दतीवर नवीन लेखकांची अधिक पुस्तके निघावीत.

६) अध्यापन एकसुरी होऊ नये.

७) मराठी अध्यापनाच्या संदर्भात आकर्षक उपक्रम राबवावेत.

८) विविध आदर्श अध्यापन पाठ वारंवार घ्यावेत.

९) प्रशिक्षणार्थ्यांचे विविध दिग्दर्शित पाठ सर्वांसमक्ष घेतले जावेत.

वरील सर्व उपायांचा विचार ` निष्कर्ष आणि शिफारशी ` या प्रकरणात निष्कर्ष काढताना आणि शिफारशी करताना केलेला आहे.

सारणी क्र. ६.५ मध्ये नोंदल्या गेलेल्या वरील अडचणींपैकी अन्य सुचविलेल्या अडचणी :

अडचण क्र. १ मराठी अध्यापनास एकापेक्षा अधिक प्राध्यापकांची आवश्यकता आहे. ही अडचण मान्य होणारी आहे. प्राध्यापक कमी आहेत ही वस्तुस्थिती आहे.

अडचण क्र. २ विषयज्ञान पूर्ण नीट घेतले जात नाही. तासिका कमी असल्याने कमी वेळात पूर्ण विषयज्ञान जात नाही ही वस्तुस्थिती आहे. विषय-ज्ञानासाठी तासिका वाढविण्याची गरज आहे.

उपाय :

वरील अडचणींवर सुचविलेल्या उपायांपैकी उपाय क्र. १. अध्यापनाचे विशेषत: विषयज्ञानाचे तास वाढवावेत, योग्य आहे.

उपाय क्र. २ अध्यापकांनी ही साधने तत्परतेने अध्यापनाच्यावेळी वापरावीत. नुसते व्याख्यान नको. हा उपाय योग्य आहे.

उपाय क्र. ५ मराठी अध्यापनपध्दतीवर नवीन लेखकांची अधिक पुस्तके निघावीत.

त्याच त्याच लेखकांची पुस्तके जास्त आहेत म्हणून वरील उपाय उपयुक्त आहे.

उपाय क्र. ७ मराठी अध्यापनाच्या संदर्भात आकर्षक उपक्रम राबवावेत हा उपाय मराठी अध्यापनपध्दती समृध्द होण्यासाठी पोषक आहे.

उपाय क्र. ८ विविध आदर्श पाठ वारंवार घ्यावेत. हा उपाय योग्य आहे. वारंवार हा शब्द महत्वाचा आहे. हे आदर्श पाठ विविध हवेत ही सूचना मान्य आहे.

उपाय क्र. ९ प्रशिक्षणार्थ्यांचे दिग्दर्शित पाठ व्हावेत हा उपाय योग्य आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

उपाय क्र. ३ अध्यापनातील अध्यापकांचे मतभेद एका व्यासपीठावर दूर व्हावेत. ह्या उपायातील व्यासपीठ हा अनेक मार्गांपैकी एक मार्ग आहे. मतभेद दूर होण्यासाठी चर्चा, परिसंवाद असे विविध मार्ग अवलंबता येतील.

उपाय क्र. ४ शुध्दलेखनाबाबत अध्यापनात भर हवा. शुध्दलेखनाकडे आवश्यक तेवढे लक्ष द्यावे पण मूळचे अध्यापन दुर्लक्षिले जाऊ नये.

उपाय क्र. ६ अध्यापन एकसुरी होऊ नये. व्याख्याने एकसुरी होतात या तक्रारीशी वरील सूचना जुळती आहे.

६.६ <u>पाठाचे टाचण काढताना येणाऱ्या अडचणी</u> :

प्रश्नावली क्र. ३ च्या चौथ्या प्रश्नात पाठाचे टाचण काढताना येणाऱ्या अडचणी दिलेल्या होत्या आणि सहमत असलेल्या अडचणीपुढे (✓) बरोबर अशी खूण करावयास सांगितली होती. सारणी क्र. ६.६ मध्ये ही माहिती नोंदविलेली आहे.

<u>सारणी क्र. ६.६</u>

पाठाचे टाचण काढताना येणाऱ्या अडचणी

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | पाठ टाचण अचूक कसे काढावे याचे व्यक्तिगत मार्गदर्शन अपुरे पडते. | २८ | ५ |
| २) | शालेय अव्यवस्थेमुळे पाठ वेळेवर घेता येत नाहीत. | २५ | ८ |
| ३) | शालेय अव्यवस्थेमुळे पाठ रद्द होतात. | २४ | ९ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ४) | मार्गदर्शकांची वेळेपूर्वी भेट होत नाही. | २९ | ४ |
| ५) | मार्गदर्शन गडबडीत उरकले जाते. | २९ | ४ |
| ६) | पाठटाचणातील संज्ञा अर्धवट समजल्या जातात. त्यांचे नीट आकलन होत नाही. | २८ | ५ |
| ७) | पाठटाचणातील बारकावे कळत नाहीत. | ३० | ३ |
| ८) | उपघटकाच्या नेमक्या स्वरूपाचा अंदाज येत नाही. | २५ | ८ |
| ९) | विद्यार्थ्यांच्या पातळीचा प्रशिक्षणार्थ्यांना नीट अंदाज येत नाही. | ३० | ३ |
| १०) | पाठटाचण कमी वेळेत पक्के करावे लागते. | २९ | ४ |

पाठाचे टाचण काढताना येणाऱ्या अडचणी त्यांना दिलेल्या प्रतिसादानुसार उतरत्या श्रेणीनुसार पुढील सारणीत (सारणी क्र. ६.७) दिल्या आहेत.

## सारणी क्र. ६.७

पाठाचे टाचण काढताना येणा-या प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रतिसादानुसार अडचणी (उतरत्या श्रेणीनुसार)

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | पाठटाचणातील बारकावे कळत नाहीत. | ३० | ३ |
| २) | विद्यार्थ्यांच्या पातळीचा प्रशिक्षणार्थ्यांना नीट अंदाज येत नाही. | ३० | ३ |
| ३) | मार्गदर्शकांची वेळेपूर्वी भेट होत नाही. | २९ | ४ |
| ४) | मार्गदर्शन गडबडीत उरकले जाते. | २९ | ४ |
| ५) | पाठटाचण कमी वेळेत पक्के करावे लागते. | २९ | ४ |
| ६) | पाठटाचण अचूक कसे काढावे याचे व्यक्तिगत मार्गदर्शन अपुरे पडते. | २८ | ५ |
| ७) | पाठटाचणातील संज्ञा अर्धवट समजल्या जातात. त्यांचे नीट आकलन होत नाही. | २८ | ५ |
| ८) | शालेय अव्यवस्थेमुळे पाठ वेळेवर घेता येत नाहीत. | २५ | ८ |
| ९) | उपघटकाच्या नेमक्या स्वरूपाचा अंदाज येत नाही. | २५ | ८ |
| १०) | शालेय अव्यवस्थेमुळे पाठ रद्द होतात. | २४ | ९ |

वरील सर्वच अडचणी या ३३ प्रशिक्षणार्थ्यांपैकी कमीतकमी प्रशिक्षणार्थ्यांना (७२.७३ टक्के) मान्य आहेत. म्हणजेच सदरच्या अडचणी बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांना मान्य आहेत. या अडचणी ब-याच जणांना प्रकर्षाने जाणवतात. म्हणजेच त्या ख-या आहेत, विचारार्ह आहेत.

या प्रश्नाच्या उत्तरार्धात या व्यतिरिक्त आणखी काही अडचणी असल्यास त्या नमूद कराव्यात असे सांगितले होते. त्या खाली नमूद केलेल्या आहेत :

१) मराठीचे ज्ञान नसणाऱ्या निरीक्षक अध्यापकाकडून मिळणारे पाठटाचणाबाबतचे मार्गदर्शन समाधानकारक नसते, ते संभ्रमकारक असते. त्यांचे शेरे परस्पर विसंगत असतात.

२) चुका नीट समजावून दिल्या जात नाहीत.

३) मार्गदर्शनाची वेळ सकाळी हवी.

४) भरगच्च कार्यक्रमानंतर पाठटाचणाचे मार्गदर्शन गडबडीत उरकले जाते.

उपरोक्त अडचणीपैकी अडचण क्र. १ मराठीचे ज्ञान नसणाऱ्या निरीक्षक अध्यापकांकडून मिळणारे पाठटाचणाबाबतचे मार्गदर्शन समाधानकारक नसते, ते संभ्रमकारक असते. त्यांचे शेरे परस्पर विसंगत असतात, अडचण क्र. २ चुका नीट समजावून दिल्या जात नाहीत, आणि अडचण क्र. ४ भरगच्च कार्यक्रमानंतर पाठटाचणाचे मार्गदर्शन गडबडीत उरकले जाते. या तीनही अडचणी वस्तुस्थितीस धरून आहेत.

अडचण क्र. ३ मार्गदर्शनाची वेळ सकाळी नाही ही अडचण दूर करणे व्यवहारात गैरसोयीचे आहे, जरी सकाळी वातावरण प्रसन्न असले तरी सर्वच प्रशिक्षणार्थींना सकाळी मार्गदर्शन घेणे सदैव शक्य होईलच असे नाही.

या अडचणींच्या संदर्भात उपाययोजना सुचविण्यास सांगितली होती. मिळालेल्या उपायात्मक सूचना पुढे दिलेल्या आहेत.

१) मराठीसाठी अधिक अध्यापक ठेवल्यास त्यांच्याकडे त्या विषयाचे मार्गदर्शन सोईस्कर होईल.

२) मराठीच्या पाठटाचणाचे मार्गदर्शन मराठीच्या अध्यापकाकडे असावे.
३) प्रशिक्षणार्थ्यांची संख्या मर्यादित असावी.
४) अध्यापकांचे मार्गदर्शन भरपूर होण्यासाठी वेळ आणि विद्यार्थी संख्या यांचा ताळमेळ हवा.
५) प्रत्येक रचना प्रकाराच्या अध्यापन टाचणाचे नमुने द्यावेत.
६) पाठटाचणाच्या आराखड्याबाबतीत सर्व महाविद्यालयांत मूलत: एकवाक्यता हवी.

या अडचणींच्या संदर्भात सुचविलेल्या उपायांपैकी उपाय क्रमांक १ मराठी-साठी अधिक अध्यापक ठेवल्यास त्यांच्याकडे त्या विषयाचे मार्गदर्शन सोयीस्कर होईल हा उपाय विधायक आहे. विशेषत: नव्या अनुदानपात्र अध्यापक महाविद्यालयात सतत वाढणारी प्रशिक्षणार्थ्यांची संख्या वाढत आहे हे लक्षात घेता अध्यापकावरील कामाचा भार कमी करण्यासाठी व प्रभावी मार्गदर्शन करणे त्यांना शक्य व्हावे म्हणून मराठी अध्यापकांची संख्या वाढवावी ही उपायात्मक सूचना रास्त आहे.

उपाय क्रमांक २ मराठीच्या पाठटाचणाचे मार्गदर्शन मराठीच्या अध्यापकाकडे असावे. हा उपाय योग्य आहे कारण मराठीच्या अध्यापकांना आशयाच्या संदर्भात पाठटाचणाच्या तंत्राबाबत सूक्ष्म मार्गदर्शन करता येते.

उपाय क्र. ३ प्रशिक्षणार्थ्यांची संख्या मर्यादित हवी. जरी ही उपायात्मक सूचना मान्य होण्याजोगी असली तरी प्रत्यक्ष चित्र, प्रशिक्षणार्थ्यांची अमर्याद संख्या हे आहे. प्रभावी अध्यापनासाठी प्रशिक्षणार्थ्यांची संख्या मर्यादित असणे केव्हाही श्रेयस्कर आहे.

उपाय क्र. ४ अध्यापकांचे मार्गदर्शन भरपूर होण्यासाठी वेळ आणि विद्यार्थी संख्या यांचा ताळमेळ हवा हा उपाय पूर्वनियोजन करून अंमलात आणणे शक्य आहे. संख्येचा आणि वेळेचा मेळ जमणे कठीण होत आहे.

उपाय क्रमांक ५. प्रत्येक रचनाप्रकाराच्या अध्यापन टाचणांचे नमुने द्यावेत. प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांस हे नमुने गोळा करणे शक्य आहे. तथापि अध्यापन टाचणांचे नमुने दिले तर उत्तमच.

उपाय क्रमांक ६. पाठटाचणाच्या आराखड्याबाबत सर्व महाविद्यालयांत मूलत: एकवाक्यता हवी. थोडे फेरफार वगळता पाठाध्यापन पाय-या सर्व पाठ-टाचणात एकच असतात.

वरील सर्वच उपाय विचारार्ह आहेत. या उपायांचा सम्यक् विचार ` निष्कर्ष आणि शिफारशी ` या प्रकरणात निष्कर्ष काढताना आणि शिफारशी करताना केलेला आहे.

६.६ पाठ घेताना येणा-या अडचणी :

प्रश्नपत्रिकेच्या प्रश्नक्रमांक ५ मध्ये पाठ घेताना येणा-या अडचणी दिलेल्या होत्या. सहमत असलेल्या अडचणींपुढे (✓) बरोबर अशी खूण करावयास सांगितली होती. सारणी क्रमांक (६.८) मध्ये मिळालेली माहिती नमूद केलेली आहे.

सारणी क्र. ६.८

पाठ घेताना येणा-या अडचणी

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | पाठ घेताना विद्यार्थ्यांची अपुरी पूर्वतयारी जाणवते. | ३० | ३ |
| २) | टाचणाप्रमाणे सर्वच सत्र लक्षात रहात नाही. | २९ | ४ |
| ३) | इतर अभ्यासामुळे पाठतयारीवर परिणाम होतो. | २१ | १२ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ४) | पाठ तयारीला प्रशिक्षणार्थ्यांना कमी वेळ मिळतो. | २८ | ५ |
| ५) | विविध रचनांचे अध्यापन तंत्र नेमके अमलात आणताना अडचण येते. | ३० | ३ |
| ६) | विवेचनावर वा प्रश्नावर अती भर येतो. | २८ | ५ |
| ७) | स्वत:चे विवेचन कौशल्य कमी पडते. | २२ | ११ |
| ८) | विद्यार्थ्यांन्यावर नियंत्रण रहात नाही. | २५ | ८ |
| ९) | प्रशिक्षणार्थ्यांची विषय पकड ढिली होते. | २४ | ९ |
| १०) | पाठ वेळेपूर्वीच संपतो. | २० | १३ |
| ११) | पाठ वेळेत संपत नाही. | २३ | १० |
| १२) | पाठ घटक अती संक्षिप्त असतो. | १९ | १४ |
| १३) | पाठ घटक अती विस्तृत असतो. | २२ | ११ |
| १४) | पाठ सरावाचा अभाव जाणवतो. | २८ | ५ |

विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादानुसार या अडचणी उतरत्या श्रेणीने पुढील सारणीत (६.९) पुन्हा दिलेल्या आहेत.

सारणी क्र. ६.९

पाठ घेताना येणा-या प्रशिक्षणार्थ्यांच्या
प्रतिसादानुसार अडचणी (उतरत्या श्रेणीनुसार)

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | पाठ घेताना विद्यार्थ्यांची अपुरी पूर्वतयारी जाणवते. | ३० | ३ |
| २) | विविध रचनांचे अध्यापन तंत्र नेमके अमलात आणताना अडचण येते. | ३० | ३ |
| ३) | टाचणाप्रमाणे सर्वच सूत्र लक्षात रहात नाही. | २९ | ४ |
| ४) | पाठतयारीला प्रशिक्षणार्थ्यांना कमी वेळ मिळतो. | २८ | ५ |
| ५) | विवेचनावर व प्रश्नावर अती भर येतो. | २८ | ५ |
| ६) | पाठ सरावाचा अभाव जाणवतो. | २८ | ५ |
| ७) | विद्यार्थ्यांवर नियंत्रण रहात नाही. | २५ | ८ |
| ८) | प्रशिक्षणार्थ्यांची विषय पकड ढिली होते. | २४ | ९ |
| ९) | पाठ वेळेत संपत नाही. | २३ | १० |
| १०) | पाठघटक अती विस्तृत असतो. | २२ | ११ |
| ११) | स्वत:चे विवेचन कौशल्य कमी पडते. | २२ | ११ |
| १२) | इतर अभ्यासामुळे पाठ तयारीवर परिणाम होतो. | २१ | १२ |
| १३) | पाठ वेळेपूर्वीच संपतो. | २० | १३ |
| १४) | पाठघटक अती संक्षिप्त असतो. | १९ | १४ |

वरील सर्वच अडचणी ३३ प्रशिक्षणार्थ्यांपैकी कमीतकमी १९ प्रशिक्षणार्थ्यांनी (५७.५८ टक्के) मान्य केलेल्या आहेत, या अडचणी वास्तव व बहुसंख्यांना प्रकर्षाने जाणवतात असे आढळले.

या प्रश्नाच्या उत्तरार्धात या व्यतिरिक्त अडचणी असल्यास त्या नमूद करावयास सांगितलेल्या होत्या. नमूद झालेल्या अडचणी खाली दिलेल्या आहेत.

१) सदोष वर्गरचनेमुळे पाठ घेताना अडचण येते.
२) विद्यार्थी गैरशिस्तीच्या आणि सततच्या पाठाने निरुत्साही बनतात.
३) अध्यापन पाय-या जखडबंद वाटतात.
४) पाठमुद्यांची एकत्र सांखळी करणे जमत नाही.
५) पाठ घेताना खंडितपणा येतो.
६) विवेचन कौशल्याबाबत मार्गदर्शन कमी मिळते.
७) प्रतिकूल, निरुत्साही हवामान पाठ घेताना प्रभाव पाडते.
८) विद्यार्थी पाठ्यपुस्तके आणीत नाहीत.
९) विषयांचा आशय नीट समजत नाही.

या अडचणींच्या संदर्भात त्यांचे निवारण करण्यासाठी उपाययोजना सुचविण्यास सांगितले होते. सुचविलेले उपाय खाली नमूद केलेले आहेत.

१) विवेचन आणि प्रश्नकौशल्यावर कृतिसत्रात विशेष भर हवा.
२) शाळेतील शिक्षकांनी वर्गशिस्तीस हातभार लावावा.
३) विविध पाठ घेण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि मार्गदर्शन द्यावे.
४) पाठतंत्रात पाठ्यांशानुरूप लवचिकता हवी.
५) एकाच दिवशी दोन दोन तास नकोत.

६) प्रशिक्षणार्थ्यांना विविध घटक मिळावेत.

७) दोन पाठात जास्त दिवसांचा विलंब नको.

८) अध्यापन साधनांचा पाठ घेताना कसा वापर करावा हे शिकवावे.

९) तंत्रापेक्षा आकलनावर भर जास्त हवा.

प्रशिक्षणार्थ्यांनी सुचविलेले वरील उपाय योग्यच आहेत. प्रकरण क्र.७ ` निष्कर्ष आणि शिफारशी ` या प्रकरणात निष्कर्ष काढताना, शिफारशी करताना हे विचारात घेतलेले आहेत.

### ६.७ मराठीचा पाठ निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी :

प्रश्नावलीच्या ६ व्या प्रश्नामध्ये मराठीचा पाठ निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी दिलेल्या होत्या आणि सहमत असलेल्या अडचणींपुढे (✓) अशी खूण करावयास सांगितली होती. सारणी क्र. ६.१० मध्ये मिळालेली माहिती नमूद केलेली आहे.

सारणी क्र. ६.१०

मराठी पाठाचे निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | प्रशिक्षणार्थ्यांचे पाठोद्दिष्ट सतत त्यांच्या डोळ्यासमोर नसते. | २९ | ४ |
| २) | प्रशिक्षणार्थी पाठ्यांशातील सूक्ष्म बारकावे व्यवस्थित उकलून दाखवू शकत नाहीत. | ३१ | २ |
| ३) | प्रशिक्षणार्थ्यांची पाठ्यांश तयारी अपुरी असते. | २६ | ७ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ४) | प्रशिक्षणार्थ्यांचे फलक लेखन अशुध्द व अव्यवस्थित असते. | २८ | ५ |
| ५) | प्रशिक्षणार्थ्यांचे विवेचन व प्रश्न कौशल्य नीट नसते. | २९ | ४ |
| ६) | प्रशिक्षणार्थ्यांचे विषयज्ञान अपुरे असते. संदर्भ चुकीचे असतात. | ३० | ३ |
| ७) | प्रशिक्षणार्थ्यांचे वर्ग नियंत्रण नसते. | २८ | ५ |
| ८) | पाठ वेळेत पूर्ण होत नाही. | २४ | ९ |
| ९) | पाठ फार लवकर पूर्ण होतो. | २६ | ७ |

विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादानुसार वरील सारणीतील (६.१०) अडचणी उतरत्या श्रेणीने मांडून पुढील सारणीत (६.११) पुन्हा दिलेल्या आहेत.

सारणी क्र. ६.११

मराठीच्या पाठाचे निरीक्षण करताना येणाऱ्या प्रतिसादानुसार अडचणी (उतरत्या श्रेणीनुसार)

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | प्रशिक्षणार्थी पाठ्यांशातील सूक्ष्म बारकावे व्यवस्थित उकलून दाखवू शकत नाहीत. | ३१ | २ |
| २) | प्रशिक्षणार्थ्यांचे विषयज्ञान अपुरे असते. संदर्भ चुकीचे असतात. | ३० | ३ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ३) | प्रशिक्षणार्थ्यांचे पाठोद्दिष्ट सतत त्यांच्या डोळ्यासमोर नसते. | २९ | ४ |
| ४) | प्रशिक्षणार्थ्यांचे विवेचन व प्रश्न कौशल्य नीट नसते. | २९ | ४ |
| ५) | प्रशिक्षणार्थ्यांचे फलक लेखन अशुध्द व अव्यवस्थित असते. | २८ | ५ |
| ६) | प्रशिक्षणार्थ्यांचे वर्ग नियंत्रण नसते. | २८ | ५ |
| ७) | प्रशिक्षणार्थ्यांची पाठ्यांश तयारी अपुरी असते. | २६ | ७ |
| ८) | पाठ फार लवकर पूर्ण होतो. | २६ | ७ |
| ९) | पाठ वेळेत पूर्ण होत नाही. | २४ | ९ |

वरील सर्व अडचणी ३३ प्रशिक्षणार्थ्यांपैकी कमीतकमी २४ प्रशिक्षणार्थी (७२.७३ टक्के) मान्य करतात. ह्या अडचणी बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांना आहेत त्यामुळे त्या ख-या आणि विचारार्ह आहेत.

या प्रश्नाच्या उत्तरार्धात आणखी काही अडचणी असल्यास त्या नमूद करावयास सांगितल्या होत्या. नमूद झालेल्या अडचणी खाली दिलेल्या आहेत.

१) निरीक्षण कसे करावे याबाबतीत मार्गदर्शन होत नाही.

२) निरीक्षणात नवीन साधनांचा वापर नाही.

३) वर्गात निरीक्षक म्हणून येणा-या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या फार असते.

४) निरीक्षणाच्या नवीन संकल्पना परिचित करून दिल्या जात नाहीत.

५) कोणात्या बाबीचे पाठात कसे निरीक्षण करायचे याचे आदर्श पाठ सादर होत नाहीत.

६) वस्तुनिष्ठ आणि सर्व बाबीचे यथार्थ निरीक्षण कुशलतेने कसे करावे हे कळत नाही.

या अडचणींच्या संदर्भात उपाय सुचविण्यास सांगितले होते. सुचविलेले उपाय खाली दिलेले आहेत :

१) निरीक्षणातील बारकावे अगोदर नीट समजावून द्यावेत.
२) अध्यापकांचे अद्ययावत निरीक्षण-प्रशिक्षण सुट्टीत घेतले जावे. ✓
३) निरीक्षणाचे मुद्दे स्पष्ट व्हावेत.
४) निरीक्षण कसे करावे हे शिकवावे.
५) निरनिराळ्या साधनांनी निरीक्षण कसे उत्तम करायचे हे शिकवावे.
६) निरीक्षण कृतिसत्रे घ्यावीत.
७) निरीक्षणाचे नेमके तंत्र समजावून द्यावे.

वरील उपायांवरून निरीक्षण तंत्र समजावून द्यावे या मुद्यावर भर दिलेला आढळतो.

वर नमूद केलेल्या सर्व अडचणींचा आणि उपायांचा सम्यक् विचार 'निष्कर्ष आणि शिफारशी' या प्रकरणात निष्कर्ष काढताना आणि शिफारशी करताना केलेला आहे.

## ६.८ 'मराठीची अध्यापनपध्दती या विषयाच्या अध्यापनाशी निगडित बाबी :

प्रश्नावली क्र. ३ च्या प्रश्न क्रमांक ८ मध्ये मराठीची अध्यापनपध्दती या विषयाच्या अध्ययनाशी निगडित गोष्टी दिलेल्या होत्या. मराठी अध्यापनपध्दतीचे अध्ययन-अध्यापन प्रभावी व्हावे म्हणून या गोष्टींबाबत कोणत्या सूचना कराव्याशा

वाटतात हे विचारलेले होते. प्रशिक्षणार्थ्यांनी दिलेला प्रतिसाद त्या त्या गोष्टीपुढे पुढील परिच्छेदातून नमूद केलेला आहे.

१) मराठीचा प्राध्यापक - चिकित्सक, बहुश्रुत, अनुभवी, अभ्यासू, व्यासंगी, उत्कृष्ट वक्तृत्व असलेला, अध्यापनतंत्रज्ञ, व्यापक पूर्ण विषयज्ञान असलेला, शुध्दलेखन, हस्ताक्षरात प्रवीण, उत्कृष्ट कथनशैलीचा, व्यासंगी, भाषाप्रभु, आजन्म विद्यार्थी-वृत्तीचा, ज्ञानसंपन्न, आकर्षक व्यक्तिमत्वाचा, मराठी प्रेमी, परभाषासहिष्णु, योग्य भरपूर, प्रेमळ मार्गदर्शन करणारा हवा. उत्कृष्ट शंका-निरसन करणारा हवा. तो अष्टपैलू असावा.

२) मराठी अध्यापनपध्दतीचा अभ्यासक्रम - विषयज्ञानाचा अभ्यासक्रम सुटसुटीत, सोपा, मूल्याधिष्ठित हवा. पुरोगामी, नवकालानुरुप, पुनर्रचित हवा. नवे जुने चांगले असणारा हवा. विद्यार्थी केंद्री आणि इतर अभ्यासक्रमाशी सुसंगत अभ्यासक्रम हवा हे म्हणणे रास्तच आहे. असे नसल्यास मूल्यमापन पर्याप्त होत नाही. ही ही सूचना रास्त आहे. कारण शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम व्यवसायाधिष्ठित असल्यामुळे व्यवसायाला अनुरुप अशी कौशल्ये अंगी बाणविण्यासाठी सराव पाठांना अधिक प्राधान्य हवेच. विषयज्ञान फार आणि गुण कमी असे अभ्यासक्रमात नको. सराव पाठांना जास्त प्राधान्य देणारा पाहिजे. सदरचा अभ्यासक्रम २१ व्या शतकास अनुरुप, भाषा कौशल्याने अपेक्षित प्रगती गाठण्यास मदत करणारा हवा.

३) मराठी अध्यापनपध्दतीवर व्याख्याने - इतर महाविद्यालयातील प्राध्यापकांची, शिक्षणशास्त्र विभागातील प्रपाठकांची, तज्ज्ञांची व्याख्याने भरपूर हवीत. चर्चा, प्रश्नोत्तरे यावर भर हवा. शंकानिरसनास वाव हवा. व्याख्याने वारंवार घेतली जावीत. ती विविध उपघटकांच्या अध्यापनावर आधारित हवीत. प्रशिक्षणार्थी जर वक्तृत्वसंपन्न असेल तर त्याचेही व्याख्यान असावे. व्याख्यानात प्रश्नोत्तरावर भर हवा. केवळ कथन नको. प्रशिक्षणार्थ्यांना विविध आणि अधिकाधिक गोष्टींशी परिचय घडवून आणण्याच्यादृष्टीने केलेल्या या सूचना स्वागतार्ह वाटतात.

४) मराठी अध्यापनपध्दती विषयक कृतिसत्रे - विविध विषयांवर वेळोवेळी उपयुक्त अशी असावीत. मराठीच्या विविध अध्यापन पध्दतीद्वारा मराठीचे पाठ चर्चेनंतर सादर केले जावेत. कृतिसत्रातून मराठीच्या अध्यापनाची सर्वंकष प्रत्यक्ष माहिती लाभावी. हस्ताक्षर, शुध्दलेखनाबाबत कृतिसत्रे, टप्प्याटप्प्याने घेतली जावीत. कृतिसत्रानंतर महत्वाच्या मुद्यांच्या प्रती चक्रमुद्रांकित स्वरूपात प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास मिळाव्यात. कृतिसत्रात वैविध्य, आकर्षकता पाहिजे. कृतिसत्रांसंबंधी केलेल्या या सूचना योग्य आणि उपयुक्त अशाच आहेत. तथापि कृतिसत्रांमध्ये सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थ्याला प्रत्यक्ष कृती करण्याची अधिकाधिक संधी मिळाली पाहिजे कारण अशा कृतींमधून सराव होतो आणि ( Practice makes a man perfect) या इंग्रजी उक्तीनुसार सरावातून प्राविण्य संपादन होते.

५) ग्रंथालय - या घटकांतर्गत ` अ ` विभागात संदर्भ ग्रंथाबाबत आलेल्या सूचना पुढे दिल्या आहेत.

संदर्भग्रंथ वेळेवर उपलब्ध व्हावयास हवेत. मराठी अध्यापनपध्दतींवरचे ग्रंथ विपुल असावेत. त्यांच्या शक्यतो नव्या आवृत्त्या असाव्यात. हे संदर्भ अध्यापकांना, प्रशिक्षणार्थ्यांना वेळेवर उपलब्ध करून देण्यात यावेत. शब्दकोश, ज्ञानकोश, साहित्य ग्रंथ भरपूर हवेत. मराठीचा खास ग्रंथकक्ष पाहिजे. केवळ शिक्षणावर जास्त पुस्तके नकोत. जुने ग्रंथ उपलब्ध व्हावेत. ग्रंथ कसे वापरावेत याचे मार्गदर्शन पाहिजे.

` ब ` विभागात पाठ्यपुस्तकांबाबत आलेल्या सूचना पुढे दिलेल्या आहेत.

पाठ्यपुस्तके भरपूर, वेळेवर मिळावीत. जुनी-नवी पाठ्यपुस्तके उपलब्ध व्हावीत. विविध प्रदेशातील उच्च निम्न स्तरावरची पाठ्यपुस्तके उपलब्ध हवीत. व्याकरणाची सुलभ भाषेतील पुस्तके भरपूर हवीत. पाठ्यपुस्तकावर विशेष खर्च व्हावा. समजण्यास सोपी हवीत. भणंग साहित्यास पाठ्यपुस्तकात वाव देऊ नये.

सुसंस्कार करणारी आदर्श पाठ्यपुस्तके हवीत. भविष्याचा योग्य वेध घेणारी हवीत.

६) दृक्श्राव्य साधने - भरपूर, अध्यापनोपयोगी, आकर्षकरितीने वापरता येणारी हवीत. साधने कशी हाताळावीत याचे प्रशिक्षण अगोदर मिळावे. साधनाबद्दल भीती वा कसे वापरायचे ही शंका दूर केली जावी. स्वत: तयार केलेली साधने वापरू द्यावीत. भाषा प्रयोगशाळा (लँग्वेज लॅबोरेटरी) पाहिजे. साधने सुटसुटीत हवीत. अर्थपूर्ण हवीत. टेपरेकॉर्डर, लिंग्वाफोनचा योग्य वापर वारंवार व्हावा. दृक्श्राव्य साधनाबाबत आणि वापराबाबत काटकसर नको. ती साधने चांगली राखली जावीत. चांगल्या त-हेने वापरली जावीत. साधनतंत्र कसे आत्मसात करायचे याचे मार्गदर्शन पाहिजे.

७) महाविद्यालयातील वातावरण प्रसन्न, अभ्यासपोषक, कल्पकता आणि नावीन्यास वाव देणारे, मोकळे, हवेशीर, साधन-सज्ज, शांत, एकांताचे असावे. शिस्तीचे वातावरण हवे. संध्याकाळी ७ वाजेपर्यन्त थकवणारे वातावरण नको. निसर्गरम्य वातावरण हवे. वाङ्मय पोषक कार्यक्रमांनी वातावरण आगळे करावे.

८) वर्गातील वातावरण चर्चा, परिसंवाद आणि मराठी भाषा, संस्कृतीचे सचित्र दर्शन घडविणारे हवे. खेळीमेळीचे हवे. मराठी अध्यापनाचा वर्ग मराठीचे साहित्य आणि साहित्यिकांचे फोटो, तक्ते यांनी समृध्द असावा. वर्गातील मराठीमय वातावरणाचा उत्तम परिणाम अध्यापनावर व्हावा. सहकार्या-द्वारा मराठीचा वर्ग मराठीमय करावा.

९) मराठीची परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन - निकष अगोदर स्पष्ट करावेत. मूल्यमापन चाकोरीबध्द नको. ग्रेड (श्रेणी) पाठटाचणात नोंदविल्या जाव्यात. मूल्यमापनाने वेळोवेळी प्रगतीची खरीखुरी जाणीव विद्यार्थ्यांना करून द्यावी. विषय-ज्ञानाच्या तोंडी परीक्षेस गुण द्यावेत. वस्तुनिष्ठ निष्कर्षांचा आधार घ्यावा.

२५ मार्कांसाठी विषयज्ञान फार होते. पाक्षिक परीक्षा घ्याव्यात. मूल्यमापन प्रोत्साहक पाहिजे.

मराठी अध्यापनपध्दतीशी निगडित असलेल्या वरील गोष्टींच्या संदर्भात प्रशिक्षणार्थ्यांनी केलेल्या सूचना रास्त आहेत. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, प्रशिक्षणार्थींना मराठी अध्यापनपध्दतीचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे याची योग्य जाणीव आहे.

मराठीची अध्यापनपध्दती या विषयाच्या अध्ययनाशी निगडित बाबीं विषयीच्या सूचनांपैकी पुढील सूचना विचारात घेण्याजोग्या आहेत.

१) मराठीचा अध्यापक याबाबतच्या महत्त्वाच्या सूचना : चिकित्सक, अनुभवी, अभ्यासू, व्यासंगी, अष्टपैलू, अध्यापनतंत्रज्ञ, उत्कृष्ट कथनशैलीचा, भाषाप्रभु असलेला आणि प्रेमळ मार्गदर्शन करणारा मराठीचा अध्यापक बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांना हवा आहे.

२) मराठी अध्यापनपध्दतीचा अभ्यासक्रम : विषयज्ञानाचा अभ्यासक्रम सुटसुटीत हवा. पुनर्रचित, कालानुरूप हवा, नव्या जुन्याचा समन्वय घालणारा हवा. विद्यार्थी केंद्री हवा अशा सूचना केलेल्या आहेत. विषयज्ञान फार आणि गुण कमी असे असू नये ही सूचना विचारार्ह आहे. मात्र वय, कुवतीनुसार अभ्यासक्रम असावा ही सूचना मान्य होण्याजोगी नाही. कारण बी.एड्. चे प्रशिक्षणार्थी परिपक्व असतात. वय आणि कुवत पाहून अभ्यासक्रम तयार करण्याइतके ते अपरिपक्व नसतात.

३) मराठी अध्यापनपध्दती वरील व्याख्याने : इतर महाविद्यालयांतील प्राध्यापकांची, शिक्षणशास्त्र विभागातील प्रपाठकांची, तज्ञांची व्याख्याने वारंवार हवीत पण कृती, चर्चा, प्रश्नोत्तरे यावर भर हवा.

विविध उपघटकांच्या अध्यापनावर व्याख्याने हवीत ही सूचना योग्य आहे. प्रशिक्षणार्थींना या व्याख्यानानंतर सहभाग घेऊ द्यावा ही सूचना रास्त आहे. केवळ व्याख्यान वा कथन नको ही सूचनाही चांगली आहे.

४) ग्रंथालय :

अ) संदर्भ ग्रंथ - मराठी अध्यापनपध्दतीवरचे ग्रंथ, शब्दकोश, ज्ञानकोश, वाङ्मयावरील पुस्तके भरपूर हवीत. त्यांच्या नव्या आवृत्त्या हव्यात ही सूचना योग्य आहे. संदर्भग्रंथाबाबतचे दुर्लक्ष चिंतनीय आहे.

ब) पाठ्यपुस्तके - भरपूर वेळेवर मिळावीत. जुनी नवी पाठ्यपुस्तके उपलब्ध व्हावीत. विविध प्रदेशातील उच्च निम्न स्तरावरची पाठ्यपुस्तके भरपूर हवीत वगैरे सूचना विचारार्ह व मान्य होण्याजोग्या आहेत.

५) दृक्श्राव्य साधने - भरपूर, अध्यापनास उपयोगी हवीत आणि ती हाताळण्याचे प्रशिक्षण अगोदर मिळावे म्हणजे साधन वापराबाबतची भीती नष्ट होईल ही सूचना रास्त आहे. स्वत: तयार केलेली साधने वापरू द्यावीत. ही सूचना उत्तम आहे. टेपरेकॉर्डर, लिंग्वाफोनचा वापर ही सूचना उचित आहे. ही साधने चांगली राखली जावीत, ही सूचना मौलिक आहे.

६) महाविद्यालयातील वातावरण व (७) वर्गातील वातावरण - मराठी अध्यापनपध्दतीस पोषक, प्रोत्साहक हवे. मराठी वाङ्मयास पोषक उपक्रमांनी भारलेले हवे. मराठीचा खास कक्ष असावा, त्यात संदर्भ ग्रंथ, चित्रे, तक्ते असावेत. वर्गात साहित्यिकांचे फोटो, वस्तू असाव्यात, ही सूचना उत्तम आहे.

८) मराठीची परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन - मूल्यमापन चाकोरीबध्द नको. श्रेणी पाठटाचणात नोंदविल्या जाव्यात. विषयाज्ञानाच्या तोंडी परीक्षेस गुण द्यावेत. मूल्यमापन वस्तुनिष्ठ हवे, प्रोत्साहक हवे.

वरील सूचना योग्य आहेत. पण मूल्यमापनात सतत नवीन प्रयोग, पाठटाचणात श्रेणी नोंदणी, विषयज्ञानाची तोंडी परीक्षा याबाबी विचारात घेण्याजोग्या आहेत.

६.९ मराठी अध्यापनपध्दती प्रभावी होण्यासाठी अभ्यासपूरक उपक्रम :

तिसऱ्या प्रश्नावलीच्या ९ व्या प्रश्नामध्ये मराठी अध्यापनपध्दतीचे अध्यापन प्रभावी व्हावे या हेतूने कोणते अभ्यासक्रमपूरक उपक्रम घ्यावेत असे विचारलेले होते. नमूद केलेल्या उपक्रमासमोर ( ✓ ) बरोबर अशी खूण करावयास सांगितलेली होती. या प्रश्नाद्वारे मिळालेली माहिती सारणी क्र. ६.१२ मध्ये नमूद केलेली आहे.

सारणी क्र. ६.१२

मराठी अध्यापनपध्दती प्रभावी होण्यासाठी अभ्यासपूरक उपक्रम

| अनुक्रम | उपक्रमाचे नाव | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या होय | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या नाही |
|---|---|---|---|
| १) | या अध्यापनपध्दतीच्या अध्ययनाबाबत चर्चा, परिसंवाद. | ३१ | २ |
| २) | प्रस्तुत अध्यापनपध्दती बाबतचे लेख-संकलन व त्यांचे वाचन. | ३१ | २ |
| ३) | मराठी अभ्यासमंडळाची स्थापना | ३२ | १ |
| ४) | अध्यापन व अध्यापनेत्तर उपक्रमांचा समन्वय. | २८ | ५ |
| ५) | हस्तलिखिते तयार करणे. | २९ | ४ |

वरील सर्व उपक्रम बहुसंख्य प्रशिक्षणार्थ्यांना मान्य आहेत. असे संबंधित सारणीचे निरीक्षण केले असता आढळून येते.

या प्रश्नाच्या उत्तरार्धात आणखी काही उपक्रम सुचवायचे असल्यास सुचवावेत असे सांगितलेले होते. सूचित उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

१) सांस्कृतिक उपक्रमात मराठीस पोषक निबंध स्पर्धा, लेख, उतारे, रसग्रहण स्पर्धा, सारांश स्पर्धा घेतल्या जाव्यात.

२) प्रशिक्षणार्थ्यांसाठी अध्यापन शिबिरे भरवावीत.

३) समाजाचा अध्यापनासाठी उपयोग करून घ्यावा.

सारणी क्रमांक ६.१२ मधील उपक्रमाव्यतिरिक्त अन्य सुचविलेल्या उपक्रमांपैकी उपक्रम क्रमांक १ सांस्कृतिक उपक्रमात मराठीच्या अध्ययन-अध्यापनास पोषक अशा निबंध स्पर्धा, लेख, उता-यांच्या परिशीलनाची स्पर्धा, सारांश स्पर्धा व्हाव्यात. या स्पर्धांचे मूल्यमापन नि:पक्षपाती व्हावे. यशस्वी स्पर्धकांना गुण द्यावेत असे या उपायाबाबत नमूद करायला हवे.

उपक्रम क्रमांक २ प्रशिक्षणार्थ्यांसाठी अध्यापन शिबिरे भरवावीत.
उपक्रम क्रमांक ३ समाजाचा अध्यापनासाठी उपयोग करून घ्यावा.
उपक्रम क्रमांक २ बाबत शिबिरात कृतिसत्रे व चर्चा सहभाग यावर भर हवा.

वरील उपक्रमांपैकी ३ क्रमांकाचा उपक्रम अभिनव आहे. समाजात चालणा-या भाषिक उपक्रमांना महाविद्यालयातील भाषिक उपक्रमाद्वारे आधार मिळावा तसेच अध्यापक महाविद्यालयीन मराठीच्या उपक्रमात समाजातील मराठी भाषा प्रेमी लोकांचे सहकार्य घ्यावे आणि मराठीचे अध्यापन प्रभावी करावे.

६.१० प्रस्तुत संशोधनास अन्य उपयुक्त माहिती :

तिस-या प्रश्नावलीच्या १० व्या प्रश्नामध्ये प्रस्तुत संशोधनास उपयुक्त होईल अशी आणखी माहिती नमूद करण्यास सांगितली होती. नमूद झालेली माहिती खाली दिलेली आहे.

१) पाठत्यारीसाठी अधिक वेळ हवा. सखोल मार्गदर्शन आणि पाठाचे मूल्यमापन अधिक सुव्यवस्थित व्हावे.

२) भाषाप्रयोगशाळेने नेमकी कोणती सुधारणा अध्यापनात केली याची नोंद वारंवार ठेवून शेवटी समग्र प्रगतीचे चित्र स्पष्ट करावे.

३) मराठी अध्यापनाद्वारे इष्ट संस्कार आणि कौशल्यांची प्राप्ती हवी.

४) विषयज्ञान परीक्षा तसेच मुलाखती घेऊन योग्य प्रशिक्षणार्थ्यास मराठी अध्यापनपध्दती द्यावी.

५) मराठीची ज्यांना खरी आवड आहे अशा प्रशिक्षणार्थ्यांना सदैव प्रोत्साहन द्यावे.

वर केलेल्या सर्वच सूचना स्वागतार्ह वाटतात. शिफारशी करताना त्यांची योग्य ती दखल घेतलेली आहे.

## ' ब ' विभाग.

### पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेला मराठी प्रमुख विषय नसलेल्या तरीही बी.एड्.ला मराठी अध्यापनपध्दती निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या समस्या

### ६.११ प्रास्ताविक :

प्रकरण सहाव्याच्या ' अ ' विभागात पदवी आणि किंवा पदव्युत्तर परीक्षेला मराठी मुख्य विषय निवडलेल्या आणि बी.एड्.ला मराठी अध्यापनपध्दती घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या समस्यांचे वर्गीकरण, विश्लेषण करून अन्वयार्थ लावलेला आहे. प्रस्तुतच्या ' ब ' विभागात पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेला मराठी प्रमुख विषय नसलेल्या तरीही बी.एड्.ला मराठी अध्यापनपध्दती निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या समस्यांचे वर्गीकरण, विश्लेषण करून अन्वयार्थ लावलेला आहे. खरे म्हणजे पदवी परीक्षेला मराठी विषय मुख्य नसताना ' मराठी अध्यापनपध्दती ' घेण्यास देता कामा नये. परंतु पदवी परीक्षेला शालेय विषय नसल्यास अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशासकीय सोयीसाठी अशा प्रशिक्षणार्थ्यांना ' मराठी अध्यापनपध्दती घेऊ देतात. काही वेळेस सक्तीचेदेखील करतात. अशा प्रशिक्षणार्थ्यांच्या काही विशेष समस्या असाव्यात. त्यांचादेखील अभ्यास व्हावा या हेतूने प्रस्तुत भागाचा समावेश केलेला आहे.

### ६.१२ संबंधित प्रशिक्षणार्थ्यांची सर्वसाधारण माहिती :

चौथ्या प्रश्नावलीच्या प्रश्नक्रमांक एकमध्ये पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेचे मुख्य तसेच गौण विषय अनुक्रमे ' अ ' आणि ' ब ' विभागात विचारण्यात आलेले होते. मिळालेली माहिती सारणी क्र. ६.१३ मध्ये नमूद केलेली आहे.

सारणी क्र. ६.१३

प्रशिक्षणार्थ्यांचे पदवी आणि पदव्युत्तर
परीक्षेस असलेले मुख्य विषय

| मुख्य विषय | पदवी परीक्षा | पदव्युत्तर परीक्षा |
|---|---|---|
| हिंदी | ९ | ३ |
| इंग्रजी | ११ | ३ |
| इतिहास | २१ | ७ |
| समाजशास्त्र | ९ | ४ |
| अर्थशास्त्र | १५ | ८ |
| तत्वज्ञान | १ | १ |
| राज्यशास्त्र | ४ | १ |
| भूगोल | ८ | १ |
| | ७८ | २८ |

सारणी क्र. ६.१३ वरुन असे स्पष्ट होते की ७८ प्रशिक्षणार्थ्यांपैकी पदवी परीक्षेस भाषा मुख्य विषय घेतलेले ७८ पैकी २० आहेत. उरलेले ५८ प्रशिक्षणार्थी पदवीपरीक्षेस भाषेतर अन्य विषय घेतलेले आहेत. ५८ भाषेतर विषय घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांनी ' मराठी अध्यापनपध्दती ' निवडलेली आहे. ' मराठी अध्यापनपध्दती ' निवडलेला प्रशिक्षणार्थी पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा लागतो. परंतु भाषा विषय मुख्य नसलेल्या प्रशिक्षणार्थ्यांनाही ' मराठी अध्यापनपध्दती ' घेण्यास अनुमती मिळालेली आहे.

तसेच पदव्युत्तर परीक्षेस भाषा हा मुख्य विषय निवडलेले २८ पैकी केवळ ६ आहेत म्हणजे २२ प्रशिक्षणार्थ्यांनी पदव्युत्तर परीक्षेस भाषेतर मुख्य विषय

निवडलेले आहेत आणि या ११ प्रशिक्षणार्थ्यांना ` मराठी अध्यापनपध्दती ` घेण्यास अनुमती देण्यात आलेली आहे. माध्यमिक शाळांमधून मराठीचे अध्यापन प्रभावी होण्याच्या दृष्टीने ही बाब निश्चितच स्पृहणीय नाही.

६.१३ पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय नसूनही बी.एड्. परीक्षेसाठी ` मराठी अध्यापनपध्दती ` निवडण्याची कारणे :

प्रश्नावलीच्या ` ब ` विभागात चौथ्या प्रश्नात पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेस मराठी हा मुख्य विषय नसूनही बी.एड्. परीक्षेसाठी ` मराठी अध्यापन-पध्दती ` निवडण्याची कारणे कोणती ते विचारलेले होते. आणि प्रश्नावलीत या प्रश्नाच्या खाली दिलेल्या कारणापुढे (✓) बरोबर अशी खूण करावयास सांगितलेली होती. सारणी क्र. ६.१४ मध्ये या प्रश्नाद्वारे मिळालेली माहिती नोंदविलेली आहे.

सारणी क्र. ६.१४

पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस मराठी हा मुख्य विषय नसूनही मराठी अध्यापनपध्दती निवडण्याची कारणे

| अनुक्रम | मराठी अध्यापन निवडण्याची कारणे | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | मराठी अध्यापनपध्दतीची आवड आहे. | ७८ | - |
| २) | मराठी अध्यापनपध्दती अभ्यासास सोपी आहे. | ७७ | १ |
| ३) | मातृभाषा म्हणून निवड केली. | ६१ | १७ |
| ४) | शासकीय भाषा म्हणून मराठीस आलेले महत्त्व लक्षात घेतले. | ५२ | २६ |
| ५) | मराठी विषयाचे अध्ययन सोपे आहे. | ६१ | १७ |
| ६) | नोकरी मिळण्यास सहाय्यक अशी ही अध्यापनपध्दती आहे. | ७० | ८ |

| अनुक्रम | मराठी अध्यापन निवडण्याची कारणे | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ७) | ही अध्यापनपध्दती कमी तयारीची व कमी साधनांची आहे. | ४८ | ३० |
| ८) | अन्य महत्त्वाच्या अध्यापनपध्दती मिळाल्या नाहीत म्हणून. | २४ | ५४ |
| ९) | महाराष्ट्र राज्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात मराठीत स्थान मिळेल म्हणून. | ४४ | ३४ |
| १०) | अध्यापक महाविद्यालयाने या विषयाची सक्ती केली. | ५ | ७३ |

छात्राध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादानुसार वरील कारणांची उतरत्या श्रेणीनुसार पुनर्मांडणी करून ती पुढील सारणीत दिलेली आहेत.

## सारणी क्र. ६.१५

### मराठी अध्यापनपध्दती निवडण्याची कारणे (प्रतिसादानुसार उतरत्या श्रेणीनुसार)

| अनुक्रम | मराठी अध्यापनपध्दती निवडण्याची कारणे | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | मराठी अध्यापनपध्दतीची आवड आहे. | ७८ | - |
| २) | मराठी अध्यापनपध्दती अभ्यासास सोपी आहे. | ७७ | १ |
| ३) | नोकरी मिळण्यास सहाय्यक अशीही अध्यापन-पध्दती आहे. | ७० | ८ |
| ४) | मातृभाषा म्हणून निवड केली. | ६१ | १७ |
| ५) | मराठी विषयाचे अध्ययन सोपे आहे. | ६१ | १७ |

| अनुक्रम | मराठी अध्यापनपध्दती निवडण्याची कारणे | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ६) | शासकीय भाषा म्हणून मराठीस आलेले महत्त्व लक्षात घेतले. | ५२ | २६ |
| ७) | ही अध्यापनपध्दती कमी तयारीची व कमी साधनांची आहे . | ४८ | ३० |
| ८) | महाराष्ट्र राज्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात मराठीस स्थान मिळेल म्हणून. | ४४ | ३४ |
| ९) | अन्य महत्त्वाच्या अध्यापनपध्दती मिळाल्या नाहीत म्हणून. | २४ | ५४ |
| १०) | अध्यापक महाविद्यालयाने या विषयाची सक्ती केली. | ५ | ७३ |

सारणी क्र. ६.१४ मधील कारण क्रमांक १ हे कारण योग्य आहे. कारण क्र. १ मराठी अध्यापनपध्दतीची आवड आहे म्हणून मराठी अध्यापनपध्दती निवडली हे कारण रास्त आहे. मातृभाषा म्हणून निवड केली हे क्रमांक ४ चे कारण योग्य आहे. शासकीय भाषा म्हणून मराठीस आलेले महत्त्व लक्षात घेतले हेही कारण रास्त आहे.

कारण क्रमांक २ मराठी अध्यापनपध्दती अभ्यासास सोपी आहे हे कारण बरोबर नाही कारण मराठी अध्यापनपध्दती अभ्यासास अवघड आहे. तसेच मराठी विषयाचे अध्ययन सोपे आहे हे कारण पटण्याजोगे नाही. कारण क्रमांक ३ नोकरी मिळण्यास सहाय्यक अशी ही अध्यापनपध्दती आहे हेही कारण खरे नाही कारण प्रत्यक्षात आधीदरच मराठी अध्यापक खूप असल्याने मराठी अध्यापनपध्दतीच्या आधारे नोकरी मिळेल असे नाही. कारण क्रमांक ७ ही अध्यापनपध्दती कमी तयारीची व कमी-

इमारतीची व कमी साधनांची आहे हेही कारण योग्य वाटत नाही. मराठी भाषेचे अध्यापन करताना अनेक कौशल्ये असावी लागतात. आशय सोपा करण्यासाठी चित्रे, तक्ते, वगैरे साधनांची गरज लागते. कारण क्र. ८ अन्य महत्वाच्या अध्यापनपध्दती मिळाल्या नाहीत म्हणून मराठी अध्यापनपध्दती घेतली याचा अर्थ केवळ नाईलाज झाला आणि इतर महत्त्वाच्या अध्यापनपध्दती मिळविण्यात अपयश आले हे कारण शैक्षणिक दृष्टया अत्यंत क्षुद्र आहे. कारण क्र. ९. महाराष्ट्र राज्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात मराठीस स्थान मिळेल म्हणून हे कारण पुरेसे व पटणारे नाही. रौप्य महोत्सवी वर्ष निमित्तमात्र आहे, प्रासंगिक आहे आणि मराठी अध्यापनपध्दती निवडण्याशी त्याचा विशेष संबंध नाही.

याच प्रश्नाच्या उत्तरार्धात आणखी काही कारणे असल्यास नमूद करावयास सांगितलेली होती. नमूद केलेली कारणे पुढे दिली आहेत :

१) मराठीचे अध्यापन केलेले आहे म्हणून.
२) मराठीचे अध्यापन करणे आवडते म्हणून.
३) मातृभाषेतून ज्ञान लवकर आत्मसात करता येते.
४) दुस-या भाषा अवघड आहेत.
५) डी.एड्.ला मराठी अध्यापनपध्दती घेतली होती.
६) मराठी विषय पूर्वी घेणे शक्य झाले नाही म्हणून.
७) मराठी साहित्य लिहिण्याची आवड आहे.
८) भाषा शिकविणे मनोरंजक आहे म्हणून.

वरील कारणांपैकी कारण क्र. ४ दुस-या भाषा अवघड आहेत हे कारण पटणारे नाही. कारण क्रमांक ६ मराठी विषय पूर्वी घेणे शक्य झाले नाही म्हणून हे कारण समर्थनीय वाटत नाही. तसेच कारण क्र. ७ मराठी साहित्य लिहिण्याची आवड आहे याचा मराठी अध्यापनपध्दतीशी तसा काहीच संबंध नाही म्हणून अप्रस्तुत वाटते.

मराठी अध्यापनपध्दतीची निवड करण्याची दिलेली इतर कारणे योग्य वाटतात. आणि त्यांचा 'निष्कर्ष आणि शिफारशी ' या प्रकरणात निष्कर्ष काढताना आणि शिफारशी करताना विचार केलेला आहे.

६.१४ मराठीच्या अध्यापनपध्दतीचे अध्ययन करताना उद्भवणाऱ्या अडचणी :

प्रश्नावलीच्या ' क ' विभागात प्रश्न क्रमांक ५ मध्ये मराठीच्या अध्यापनपध्दतीचे अध्ययन करताना उद्भवणाऱ्या अडचणी दिलेल्या होत्या आणि सहमत असलेल्या अडचणीपुढे ( ✓) बरोबर अशी खूण करावयास सांगितली होती. सारणी क्रमांक ६.१६ मध्ये या प्रश्नाद्वारे मिळालेली माहिती नमूद केलेली आहे.

सारणी क्र. ६.१६

मराठीच्या अध्यापनपध्दतीचे अध्ययन करताना उद्भवणाऱ्या अडचणी

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | मराठी अध्यापनपध्दतीचा अभ्यासक्रम बोजड आहे. | ६३ | १५ |
| २) | मराठी अध्यापनपध्दतीचा अभ्यासक्रम आकर्षक व नावीन्यपूर्ण वाटत नाही. | ५९ | १९ |
| ३) | पूर्वीचे मराठीबद्दलचे अध्ययन फार अपुरे आहे असे जाणवते. | ७३ | ५ |
| ४) | नवीन पारिभाषिक शब्दांचे व्यवस्थित आकलन होत नाही. | ६९ | ९ |
| ५) | प्राध्यापकांनी शिकविताना दिलेले संदर्भ विषयज्ञान नसल्याने कळत नाहीत. | ६९ | ९ |

| अनुक्रम | अडचणीची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ६) | अध्ययन करताना समजण्यात अडथळे आल्याने प्राध्यापकांच्या अध्यापनाशी समरस होता येत नाही. | ५२ | २६ |
| ७) | मराठीचे आपणास काहीच माहीत नाही अशी भावना मनात होऊन तिचा अध्ययनावर अनिष्ट परिणाम होतो. | ५० | २८ |
| ८) | प्राध्यापकांकडून शंकानिरसन समाधानकारक होत नाही. | ४२ | ३६ |
| ९) | मराठीचे पूर्व व अपेक्षित ज्ञान नसल्याने शंका विचारणे नीट जमत नाही. | ७३ | ५ |
| १०) | नवीन संदर्भ ग्रंथ, पूरक ग्रंथ दृक्श्राव्य साधने, अध्यापनपध्दतीवरचे ग्रंथ, सहजासहजी व वेळेत उपलब्ध होत नाहीत. | ७४ | ४ |
| ११) | भाषिक कौशल्ये व उद्दिष्टांचे ज्ञान यांच्याशी स्पष्ट परिचय नसतो. | ६४ | १४ |
| १२) | पाठमार्गदर्शक, पाठनिरीक्षक व अध्यापनपध्दती शिकविणाऱ्यांच्या कार्यात सुसंगती नसते. | ६८ | १० |
| १३) | प्रशिक्षणार्थ्यांचा बराच वेळ सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अती व्यापात जातो. | ७३ | ५ |
| १४) | मुद्दे कसे टिपावेत हे कळत नाही. | ७१ | ७ |

वरील सारणीतील (६.१६) मराठीच्या अध्यापनपध्दतीचे अध्ययन करताना उद्भवणाऱ्या अडचणींना छात्राध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादानुसार त्यांची उतरत्या श्रेणीनुसार पुनर्मांडणी करून त्या अडचणी पुन्हा पुढील सारणीत (६.१७) नमूद केल्या आहेत.

## सारणी क्र. ६.१७

मराठीच्या अध्यापनपध्दतीचे अध्ययन करताना उद्भवणाऱ्या अडचणी (प्रतिसादानुसार उतरत्या श्रेणीनुसार)

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | नवीन संदर्भग्रंथ, पूरक ग्रंथ, दृक्श्राव्य साधने, अध्यापनपध्दतीवरचे ग्रंथ सहजासहजी व वेळेत उपलब्ध होत नाहीत. | ७४ | ४ |
| २) | पूर्वीचे मराठीबद्दलचे अध्ययन फार अपुरे आहे असे जाणवते. | ७३ | ५ |
| ३) | मराठीचे पूर्व व अपेक्षित ज्ञान नसल्याने शंका विचारणे नीट जमत नाही. | ७३ | ५ |
| ४) | प्रशिक्षणार्थ्यांचा बराच वेळ सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अती व्यापात जातो. | ७३ | ५ |
| ५) | मुद्दे कसे टिपावेत हे कळत नाही. | ७१ | ७ |
| ६) | नवीन पारिभाषिक शब्दांचे व्यवस्थित आकलन होत नाही. | ६९ | ९ |
| ७) | प्राध्यापकांनी शिकविताना दिलेले संदर्भ विषयज्ञान नसल्याने नीट कळत नाहीत. | ६९ | ९ |
| ८) | पाठमार्गदर्शक, पाठनिरीक्षक व अध्यापनपध्दती शिकविणाऱ्यांच्या कार्यात सुसंगती नसते. | ६८ | १० |
| ९) | भाषिक कौशल्ये व उद्दिष्टांचे ज्ञान यांच्याशी स्पष्ट परिचय नसतो. | ६४ | १४ |
| १०) | मराठी अध्यापनपध्दतीचा अभ्यासक्रम बोजड आहे. | ६३ | १५ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ११) | मराठी अध्यापनपध्दतीचा अभ्यासक्रम आकर्षक व नावीन्यपूर्ण वाटत नाही. | ५९ | १९ |
| १२) | अध्ययन करताना समजण्यात अडथळे आल्याने प्राध्यापकांच्या अध्यापनाशी समरस होता येत नाही. | ५२ | २६ |
| १३) | मराठीचे आपणास काहीच माहीत नाही अशी भावना मनात येऊन त्याचा अध्ययनावर अनिष्ट परिणाम होतो. | ५० | २८ |
| १४) | प्राध्यापकांकडून शंका निरसन समाधानकारक होत नाही. | ४२ | ३६ |

वरील सारणीतल (६.१७) मध्ये ज्या अडचणी दिलेल्या आहेत त्यापैकी अडचण क्र. २ - पूर्वीचे मराठीबद्दलचे अध्ययन फार अपुरे आहे असे जाणवते, अडचण क्र. ३ - मराठीचे पूर्व व अपेक्षित ज्ञान नसल्याने शंका विचारणे नीट जमत नाही, अडचण क्रमांक ५ - मुद्दे कसे टिपावेत हे कळत नाही, अडचण क्रमांक ६ - नवीन पारिभाषिक शब्दांचे व्यवस्थित आकलन होत नाही, अडचण क्रमांक ७ - प्राध्यापकांनी शिकविताना दिलेले संदर्भ विषयज्ञान नसल्याने कळत नाहीत, अडचण क्रमांक १० - मराठी अध्यापनपध्दतीचा अभ्यासक्रम बोजड आहे, अडचण क्रमांक ११ - मराठी अध्यापनपध्दतीचा अभ्यासक्रम आकर्षक व नावीन्यपूर्ण वाटत नाही, अडचण क्रमांक १२ - अध्ययन करताना समजण्यात अडथळे आल्याने प्राध्यापकांच्या अध्यापनाशी समरस होता येत नाही, अडचण क्रमांक १३ - मराठीचे आपणास काहीच माहीत नाही अशी भावना मनात होऊन त्याचा अध्ययनावर अनिष्ट परिणाम होतो. या अडचणी पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय नसल्याने

उद्‌भवलेल्या आहेत. अडचण क्रमांक १, ४, ८, ९, १४ या अडचणी सर्वच मराठी प्रशिक्षणार्थ्यांना समान असल्याने त्यांचा उल्लेख सारणी क्रमांक ६.५ मध्ये केलेला आहे. (पृ.१०३)

याच प्रश्नाच्या उत्तरार्धात इतर काही अडचणी येत असल्यास त्या नमूद करावयास सांगितलेल्या होत्या. व्यक्त अडचणी खाली दिलेल्या आहेत :

१) मराठीबद्दलची अभिरूची नीट संवर्धित केली जात नाही.

२) व्याकरण ज्ञान कच्चे असते.

३) आर्ट्स कॉलेजमध्ये विषयज्ञानाच्या वारंवार परीक्षा नसतात त्यामुळे पक्क्या विषयज्ञानाच्या अभावी पाठ घेणे नीट जमत नाही.

४) ग्रामीण भागातून आल्याने आणि नागर उच्चारांशी नीट ओळख नसल्याने पाठ नीट वठत नाही.

५) प्राध्यापकांचे अध्यापन रंजक नसते.

६) कमी वेळेत खूप शिकणे सरावा-अभावी जमत नाही.

७) प्राचीन काव्याच्या अध्यापनाच्यावेळी शब्दार्थ नीट सांगता येत नाहीत. पौराणिक दाखले स्पष्ट करता येत नाहीत.

८) शिकविताना तुटकपणा येतो.

९) शुध्दलेखनाचे नियम नीट समजावून दिले जात नाहीत.

या अडचणींच्या संदर्भात उपायात्मक सूचना नमूद करावयास सांगितल्या होत्या. नमूद झालेल्या सूचना खाली दिलेल्या आहेत :

१) पहिल्या सत्रात प्रात्यक्षिके, सांस्कृतिक कार्यक्रम संपवून दुस-या सत्रात अभ्यासावर, अध्यापनावर जास्त भर द्यावा.

२) शेवटी अभ्यासक्रम गडबडीने आटोपला जाऊ नये.

३) माध्यमिक शाळेपासून मराठीचे सखोल, प्रगतज्ञान स्तरानुसार द्यावे.

४) आदर्श पाठांची विविध प्रात्यक्षिके हवीत. केवळ व्याख्याने अपुरी पडतात.

५) वर्गाची समान आकलनपातळी ठरवून सर्वांना शिकवावे त्यासाठी अगोदर आकलन चाचणी घ्यावी.

६) भाषिक उपक्रम जास्त हवेत.

७) व्याकरणाच्या, निबंधाच्या अध्यापनावर जास्त भर हवा.

८) मुद्दे कसे टिपावेत हेही शिकवावे.

९) पदवी वा पदव्युत्तर परीक्षेला मराठी मुख्य विषय नसलेल्यांना स्वतंत्रपणे शिकवावे.

१०) ग्रामीण भागातील मागासलेल्या प्रशिक्षणार्थ्यांकडेही विशेष लक्ष द्यावे.

वरील उपायांपैकी ५, ७, ९, १० या उपायांचा सम्यक् विचार `निष्कर्ष आणि शिफारशी` या प्रकरणात निष्कर्ष काढताना आणि शिफारशी करताना केलेला आहे.

सारणी क्र. ६.१७ मध्ये सुचविलेल्या अडचणीव्यतिरिक्त अन्य अडचणींपैकी अडचण क्र. १ - मराठीबद्दलची अभिरुची नीट संवर्धित केली जात नाही. अडचण क्र.२ - व्याकरण कठीण असते, अडचण क्र. ३ - आर्टस् कॉलेजमध्ये विषयज्ञानाच्या वारंवार परीक्षा नसतात त्यामुळे पक्क्या विषयज्ञानाअभावी नीट जमत नाही. अडचण क्र. ६ - कमी वेळेत खूप शिकणे सरावाअभावी जमत नाही. अडचण क्र. ७ - प्राचीन काव्याच्या अध्यापनाच्यावेळी शब्दार्थ नीट सांगता येत नाहीत. पौराणिक दाखले स्पष्ट करता येत नाहीत. अडचण क्र. ९ - शुद्धलेखनाचे नियम नीट समजावून दिले जात नाहीत. अडचण क्र. १० - संदर्भ स्पष्टीकरण होत नाही. या अडचणी पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेला मराठी मुख्य विषय नसल्यामुळे उद्भवलेल्या आहेत. अडचण क्रमांक ४, ५, ८ या अडचणी सारणी क्र. ६.५ (पृष्ठ क्रमांक 103 ) मध्ये पूर्वी नोंदविलेल्या आहेत.

वरील अडचणींच्या संदर्भात सुचविलेल्या उपायांपैकी उपाय क्रमांक ३ - माध्यमिक शाळेपासून मराठीचे सखोल, प्रगत ज्ञान द्यावे. हा उपाय मराठीचा पाया भक्कम होण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे.

पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय नसलेल्यांना मराठी अध्यापनपध्दती अध्यापक महाविद्यालयात देऊ नये आणि जर देण्यात आली तर त्यांना स्वतंत्रपणे विषयज्ञान शिकवावे हा ही उपाय ग्राह्य आहे.

उपाय क्र. २ - शेवटी अभ्यासक्रम गडबडीने आटोपला जाऊ नये. हा अभ्यासक्रम फार कमी कालखंडात आटोपला जातो, ही वस्तुस्थिती आहे. योग्य वेळ सर्व घटकांना मिळावा. उपाय क्र. ४ - आदर्श पाठांची विविध प्रात्यक्षिके हवीत. केवळ व्याख्याने नकोत, उपाय क्र. ५ - वर्गाची खास आकलनपातळी ठरवून सर्वांना शिकवावे. त्यासाठी अगोदर आकलन चाचणी घ्यावी, उपाय क्र. ६ - भाषिक उपक्रम जास्त हवेत, उपाय क्र. ७ - व्याकरणाच्या, निबंधाच्या अध्यापनावर जास्त भर द्यावा, उपाय क्र. १० - ग्रामीण भागातील मागासलेल्या प्रशिक्षणार्थ्यांकडेही विशेष लक्ष द्यावे हे सर्व उपाय योग्य आहेत आणि संबंधित प्रशिक्षणार्थ्यांस सोयीचे आहेत.

उपाय क्र. १ - पहिल्या सत्रात प्रात्यक्षिके, सांस्कृतिक कार्यक्रम संपवून दुसऱ्या सत्रात अभ्यासावर, अध्यापनावर जास्त भर द्यावा हा उपाय योग्य वाटत नाही. अभ्यास व अध्यापनावर प्रथमपासून भर हवा. सर्व घटकांना समान वाटणीनुसार योग्य तेवढा वेळ मिळावा.

मुद्दे कसे टिपावे हे ही शिकवावे. हा उपाय योग्य वाटत नाही कारण कला विषयाच्या पदवीधरांनी पूर्वी मुद्दे काढलेले असतात. जे शिकविले आहे तेच पुन्हा सविस्तर शिकविणे इष्ट नाही. मुद्दे टिपण्याचे कौशल्य हा पूर्वस्तरावरचा भाग आहे.

६.१५ मराठी अध्यापनपध्दतीच्या अध्ययनाशी
निगडित गोष्टी :

प्रश्नावलीच्या प्रश्नक्रमांक ६ मध्ये ' मराठी अध्यापनपध्दती ' या विषयाच्या अध्ययनाशी निगडित काही गोष्टी दिलेल्या होत्या तसेच हे अध्ययन अध्यापन प्रभावी व्हावे म्हणून या गोष्टींबाबत सूचना करावयास सांगितलेल्या होत्या.

१) मराठी अध्यापनपध्दती या विषयाचा अध्यापक :

मराठी अध्यापनपध्दती या विषयाचा अध्यापक विषयतज्ञ, कुशल, प्रशिक्षणार्थ्यांबाबत सहानुभूती असलेला, पदवी आणि पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण असलेला, व्यासंगी, कुशल योजक, कल्पक मार्गदर्शक आणि शंका निरसन करणारा हवा. हायस्कूलमध्ये मराठी शिकविण्याचा भरपूर अनुभव असलेला पाहिजे. बी.ए., एम्.ए., बी.एड्. परीक्षेला मराठी मुख्य विषय असलेला पाहिजे. उत्कृष्ट सुसंगत विवेचक हवा, स्पष्टोच्चार करणारा शुध्द वाणीचा हवा. ग्रंथकार असेल तर उत्तम होईल. विविध रचनापाठ घेऊन दाखविणारा आणि घेण्यास मार्गदर्शक करणारा, जुने नवे चांगले स्वीकारणारा पाहिजे. चारित्र्यसंपन्न हवा. या पध्दतीच्या समस्या सोडविण्यास मदत करणारा हवा. सतत विद्यार्थीवृत्तीचा आणि विषयपारंगत हवा. शिकविल्यानंतर संकलन आणि शंकानिरसनावर भर देणारा हवा. इतर भाषांचे तौलनिक ज्ञान असणारा हवा. कल्पक आणि सर्जनशील हवा. सखोल विस्तृत विषयज्ञान असणारा हवा. आशय सोपा करून सांगण्याची सुलभ हातोटी हवी. विविध अध्यापन पध्दतीवर प्रभुत्व हवे. प्रात्यक्षिकावर भर देणारा तसेच उत्तम संग्राहक, विश्लेषक, मराठीचा अभिमान वाढविणारा हवा.

१) मराठी अध्यापनपध्दतीचा अभ्यासक्रम :

मराठी अध्यापनपध्दतीचा अभ्यासक्रम दर्जेदार, प्रगत, आटोपशीर, सखोल, जीवनानुभवाशी सुसंगत, मूल्याधिष्ठित, सृजनशीलतेस पोषक, पुरोगामी, नवकालानुरूप, आवश्यक त्यावरच भर देणारा, वय, स्तर, उद्दिष्टे यांचा योग्य विचार झालेला, आकलनाच्या सर्वसाधारण पातळीवर घेतलेला, क्लिष्ट नसलेला, विषयज्ञानावर अती भर न देणारा क्रमान्वित हवा. एका वर्षाच्या मानाने जास्त नसावा. विषयज्ञानात निवडक भाग असावा. इतर बिनमहत्वाचे तपशील नकोत. व्याकरणाचे सर्वच ज्ञान एकाच वर्षी अपेक्षिणारा नसावा. २५ गुणांसाठी महाप्रचंड आणि अति विस्तृत अभ्यासक्रम नसावा, तो लवचिक हवा. साहित्य आणि शिक्षण यांना परस्परपूरक अभ्यासक्रम हवा. विकास आणि भाषिक प्रगतीस पोषक अभ्यासक्रम पाहिजे. सर्व घटकांना योग्य प्रतिनिधित्व देणारा हवा. अभ्यासक्रम अध्यापनाची उत्तम सुलभ तयारी होण्यास प्रोत्साहक असावा.

२) मराठी अध्यापनपध्दतीची व्याख्याने :

मराठी अध्यापनपध्दतीची व्याख्याने चर्चेवर आधारित हवीत. व्याख्याने नेहमी विविध विषयांवर हवीत. विविध उपघटकावर व्हावीत. व्याख्यानामुळे मराठीबद्दल अभिरुची वाढली जावी. सर्वांची व्याख्यानास उपस्थिती असावी. व्याख्यानांना प्रात्यक्षिकांची जोड हवी. व्याख्यानासाठी नवीन प्राध्यापक, इतर महाविद्यालये आणि शाळांचे अनुभवी मराठी अध्यापनतज्ञ बोलवावेत. व्याख्याने क्रमवार मुद्दयावर आधारित हवीत. एका वर्षात बाहेरील नामवंत वक्त्यांची किमान पाच तरी व्याख्याने हवीत. व्याख्यानांची तारीख, व्याख्यानातून काय नोंदवायचे वगैरेची पूर्वतयारी प्रशिक्षणार्थ्यांच्या आणि प्राध्यापकांच्या मदतीने केली जावी. विविध विद्यापीठांतील प्राध्यापक व्याख्यानासाठी आमंत्रित करावेत. व्याख्यानांचे वेळापत्रक वर्षारंभी तयार हवे. विषयनोंद त्या वेळापत्रकात हवी. व्याख्यात्यांशी संपर्क आयत्यावेळी साधला जाऊ नये. व्याख्यात्यास तयारीसाठी अगोदर बरेच दिवस

द्यावेत. व्याख्यान म्हणजे फारसे किंवा दिखाऊ भाग बनू नये. व्याख्याने नावीन्यपूर्ण हवीत. व्याख्याने मुद्रित व्हावीत. ती पुन: पुन्हा नंतर ऐकावीत. सेवानिवृत्त प्राध्यापकांची व्याख्याने हवीत. प्राध्यापकांची व्याख्यात्यांची व्याख्याने अगोदर ऐकून कोणास बोलवावयाचे ते अगोदर ठरवावे. ग्रंथलेखकांची व्याख्याने असावीत. व्याख्यान फलप्रद व्हावीत म्हणून सर्वांचे प्रयत्न हवेत.

४) मराठी अध्यापनपध्दती विषयक कृतिसत्रे :

मराठी अध्यापनपध्दती विषयक कृतिसत्रे मराठी भाषेच्या विविध उपघटकावर हवीत. कॉलेजच्या वेळेत घ्यावीत. प्राध्यापकांसाठी या विषयावर सुट्टीमध्ये कृतिसत्रे सेवांतर्गत हवीत. कृतिसत्राचे सारांश छापील स्वरूपात प्रशिक्षणार्थींना द्यावेत. भरपूर उद्बोधक कृतिसत्रे हवीत. व्याकरण, कविता, रचना यांच्या अध्यापनावर कृतिसत्रात भर पाहिजे. कृतिसत्रात समस्या, शंका निरसन तात्काळ तिथेच व्हावे. शुध्दलेखनावर कृतिसत्र हवे. कृतिसत्राचे महत्वाचे सर्व मुद्दे छापून मिळावेत. मागील कृतिसत्राच्या अहवालावरून पुढील कृतिसत्रासाठी योग्य ती तयारी करून सुधारणा घडवून प्रशिक्षणार्थींच्या मराठीच्या अध्यापनात कितपत नोंद झाली याचे मधून मधून मूल्यमापन व्हावे. कृतिसत्राच्यावेळी आवश्यक तेव्हाच पुनरावलोकन पाहिजे. सखोल ज्ञान देणारी कृतिसत्रे पाहिजेत. मुद्दे कसे काढावेत यावर कृतिसत्र आणि प्रात्यक्षिके पाहिजेत. भाषिक सहलीद्वारा प्रत्यक्ष भाषाकार्य व्हावे.

५) ग्रंथालय :

अ) संदर्भ ग्रंथ : विपुल आणि वेळीच वापरावयास मिळावेत. ग्रंथ कसे वापरावेत याचे मार्गदर्शन हवे. तौलनिक स्वरूपाचे भाषाध्यापन ग्रंथ भरपूर हवेत. अद्ययावत आणि नव्या आवृत्तीचे ग्रंथ हवेत. जुन्या ग्रंथांचा संग्रह हवा. प्रत्यक्ष ते ग्रंथ वाचण्यास मिळावेत. नुसता ग्रंथांचा ` शो ` नको. एकाच लेखकाच्या प्रतीवर

भर नको. काव्यसंग्रह, कथासंग्रह, साहित्यग्रंथ विविध हवेत. संदर्भ कसे नोंदवावेत हे अगोदर सांगावे. शब्दकोष, ज्ञानकोष विपुल हवेत. आवश्यक तेवढेच भाषा-ग्रंथांचे स्वतंत्र मराठी दालन पाहिजे. ग्रंथ सूची अद्ययावत आणि चटकन् ग्रंथ मिळण्यास सुलभ, सुवाच्य हस्ताक्षरात हवी. परभाषिक लेखकांचे मराठी अध्यापनपध्दतीवरचे ग्रंथ पाहिजेत. व्याकरण, रचना यावर संदर्भ ग्रंथ वेळेपूर्वी मिळावेत. प्राध्यापकांनी संदर्भग्रंथांची माहिती सविस्तर द्यावी. कोणत्या संदर्भ-ग्रंथात कोणती माहिती कशी घ्यायची याचे मार्गदर्शन करावे.

ब) पाठ्यपुस्तके : नवी जुनी चटकन्, भरपूर उपलब्ध हवीत. पाठ्यपुस्तकात सर्व लेखनप्रकारांना योग्य प्रतिनिधित्व हवे. सर्व इयत्तांची पाठ्यपुस्तके मिळावीत. पाठ्यपुस्तकातील मजकूर आकर्षकरितीने सादर केला जावा. पाठ्यपुस्तके दर्जेदार हवीत. नवीन अपेक्षित उद्दिष्टानुसार सुधारित करावीत. वैचारिक क्लिष्ट लेख पाठ्यपुस्तकात जास्त नकोत. चित्रे आकर्षक आणि लेखनभाषा सोपी असलेली पाठ्यपुस्तके भरपूर पाहिजेत. पाठ्यपुस्तके नीट हाताळली जावीत. काठिण्यपातळी लक्षात घेऊन वयाचा विचार करून, भाषिक प्रगतीस पोषक अशी पाठ्यपुस्तके तयार केली पाहिजेत.

क) दृक्-श्राव्य साधने :

दृक्-श्राव्य साधने प्रभावी, आकर्षक, प्रत्यक्ष वापरास मिळणारी पाहिजेत. आकर्षकरितीने कशी वापरावीत याचे अगोदर मार्गदर्शन व्यवस्थित मिळावे. स्वयंसाधन निर्मितीस प्रोत्साहन द्यावे. चित्रे, तक्ते, ओव्हरहेड प्रोजेक्टर यासाठी प्रशस्त हॉल पाहिजे. अद्ययावत साधनांच्या योग्य वापराने काय, किती ज्ञान मिळाले याचे टाचण प्रशिक्षणार्थ्यांनी काढणे जरूर आहे. टी.व्ही., रेडिओवर मराठी अध्यापनपध्दतीवरचे विविध कार्यक्रम वारंवार सादर करण्यासाठी तज्ञ प्राध्यापकांनी त्या त्या माध्यमास सहकार्य करावे. स्वतंत्र भाषा प्रयोगशाळा पाहिजे आणि तिचा व्यवस्थित वापर केला पाहिजे. दृक्-श्राव्य साधनांच्या माहिती आणि वापराबाबत कृतिसत्र पाहिजे. लिंग्वाफोन, टेपरेकॉर्डर, टी.व्ही.

वा किती वारंवार उपयोग झाला याची नोंद व्हावी. भाषाकौशल्य या साधनांनी कितपत वाढले हे वारंवार व्यक्तिगत स्तरावर प्रयोगाद्वारे नोंदवावे, जिवंत भाषिक अनुभव या साधनांद्वारे मिळावेत. साधने ही शिक्षण माध्यमे कशी आहेत ते कृतिसत्रातून अनुभवू द्यावे. साधने विविध भरपूर हवीत. रोचक, कसदार अध्यापनास या साधनांचा वापर सहाय्यक होऊ शकेल.

७) <u>महाविद्यालयातील वातावरण</u> :

महाविद्यालयातील वातावरण अध्यापनानुकूल, प्रसन्न, मोकळे, आनंदी, सहकार्यास वाव देणारे प्रशांत, खेळीमेळीचे पाहिजे. ग्रंथालये, संमेलने, परिषदा, इत्यादींनी युक्त हवे. तणावरहित पाहिजे. निसर्गरम्य वातावरण पाहिजे. मराठी उपक्रमांना अधिक प्रोत्साहन देणारे पाहिजे. जनरेटर, एअरकूलर प्रसंगी हवेत योग्य अध्यापनसोयी पाहिजेत. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वातावरण सर्व सोयींनी युक्त असावे. अभ्यासिका प्रारंभापासून जास्तीतजास्त वेळ अभ्यासासाठी उपलब्ध पाहिजे. सुसंस्कारांना पोषक असे महाविद्यालयीन वातावरण पाहिजे. साहित्यिकांचे, मराठीच्या शिक्षण तज्ञांचे जन्मदिन, पुण्यतिथी यावर आधारित मराठी साहित्याच्या अभिरूचीचे वर्धक कार्यक्रम महाविद्यालयात व्हावेत.

८) <u>वर्गातील वातावरण</u> :

वर्गातील वातावरण खेळीमेळीचे, मराठी भाषेच्या अध्यापनास पोषक पाहिजे. साहित्यिकांची चित्रे, तक्ते, अध्यापन यंत्रे, विविध भाषा ग्रंथांनी युक्त असे वातावरण हवे. वर्गात मराठीबद्दल स्नेहाचा ठायीठायी प्रत्यय विविध माध्यमाद्वारे यावा. हस्तलिखिते, सुंदर शुध्द हस्ताक्षर नमुने, प्रसिध्द ग्रंथांचे साहित्य संमेलनांचे वैशिष्टय नमूद करणारे तक्ते यांनी वातावरण मराठीमय करावे. गोंधळ आणि गर्दीचे वातावरण नसावे. वर्गात गटसंमेलने, परिसंवाद, परिषदा भरवाव्यात. आणि मराठीचा सम्यक् परिचय गटाद्वारे अधिकाधिक आकर्षक स्वरूपात करून दिला जावा. मराठीच्या खास वर्गात वाङ्मयेति-हासाचे

सचित्र प्रदर्शन हवे. मराठी अध्यापनपध्दतीचे अध्ययन करण्यास हवी, गोडी वाटेल असे सर्व प्रयत्न करून वर्गातील वातावरण मराठी आणि ती शिकविणा-या, शिकणा-या प्रशिक्षणार्थ्यांच्या हितास पोषक हवे. मराठी वर्ग उत्तम करण्यास प्राचार्य, प्राध्यापक, प्रशिक्षणार्थी यानी नेहमी परस्पर सहकार्याने राहिले पाहिजे. सर्वांत अधिक प्राधान्य मराठी वर्गास दिले पाहिजे. बैठक व्यवस्था विद्यार्थ्यांच्या प्रमाणात सुयोग्य पाहिजे.

९) मराठीची परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन :

दैनंदिन बाबींचे मूल्यमापन व्हावे. नोंदीत वस्तुनिष्ठता हवी. न्यायपूर्णता हवी. विविध कौशल्यांचे मूल्यमापन व्यक्तिपरत्वे हवे. गुण आणि श्रेणी यांचा योग्य ताळमेळ घालावा. तोंडी विषयज्ञान परीक्षा, लेखी विषयज्ञान परीक्षा वारंवार घ्याव्यात. विविध घटक चाचण्या हव्यात. प्रशिक्षणार्थ्यांना वेळीच वारंवार प्रगतीची यथार्थ जाणीव करून घ्यावी. हस्ताक्षर, शुध्दलेखन चाचण्या, भाषिक कौशल्य चाचण्या, पाठाध्यापन चाचण्या अगोदर तयारी करून, शिकविल्यावर, घ्याव्यात. मूल्यमापन वास्तव व्हावे. निरनिराळ्या स्पर्धांद्वारे मूल्यमापन वेळोवेळी करावे. ते विश्वासार्ह हवे. गृहपाठाच्या त्रुटी तपासल्यानंतर सांगाव्यात. स्थूल मूल्यमापनास थारा देऊ नये. सृजनशीलतेस, कल्पकतेस प्रोत्साहन देणा-या स्पर्धेद्वारे सुव्यवस्थित मूल्यमापन झाले पाहिजे. गुणदान उत्तरांना योग्य न्याय देणारे हवे. प्रकरण शिकविल्यावर चाचणी घ्यावी. चाचणीचे शीर्षक स्पष्ट असावे. विविध उपघटकांमध्ये किती प्रावीण्य संपादन केले यासाठी मूल्यमापन विविध तंत्रांनी, साधनांनी युक्त असावे.

याच प्रश्नाच्या उत्तरार्धात मराठी अध्यापनपध्दती या विषयाच्या अध्ययनाशी निगडित असलेल्या परंतु वर न आलेल्या आणखी काही गोष्टीं-विषयी सूचना करावयाच्या असल्यास त्या गोष्टींचा उल्लेख करून त्यापुढे सूचना देण्यास सांगितलेले होते. प्राप्त सूचना पुढे नोंदविलेल्या आहेत.

विविध क्लृप्त्यांनी युक्त असे व्याकरण अध्यापनाचे नमुनेदार पाठ सादर करावेत. विविध स्वाध्याय स्पर्धा ठेवून, तसेच विविध प्रस्तावना स्पर्धा, विषय प्रतिपादन स्पर्धा, संकलन स्पर्धा ठेवून सर्वोत्कृष्ठ प्रशिक्षणार्थ्यांस पारितोषिक देण्यात यावे.

कला महाविद्यालयातील प्राध्यापकांशी अध्यापन कार्याबाबत समन्वय साधावा. परस्पर विचारविनिमयाचे मराठीस पोषक उपक्रम यशस्वी करावेत. समान व्यासपीठावर एकत्र येऊन व्याख्याने, कृतिसत्रांद्वारा मराठीचे अध्यापन प्रभावी करण्यासाठी सर्वांनी झटून प्रयत्न करावेत. व्यक्तिगत मार्गदर्शनासाठी सकाळची वेळ हवी. मराठी अध्यापनासाठी इतर भाषेच्या अध्यापनतंत्राची मदत घ्यावी.

प्राध्यापकांनी सुलभ विवेचनासाठी भरपूर उदाहरणे द्यावीत.

वरील सूचनांचा सम्यक् विचार ` निष्कर्ष आणि शिफारशी ` या प्रकरणात निष्कर्ष काढताना आणि शिफारशी करताना केलेला आहे.

मराठी अध्यापनपध्दतीच्या अध्ययनाशी निगडित गोष्टीबाबतच्या खालील सूचना योग्य आहेत :

१) मराठी अध्यापनपध्दतीचा अध्यापक :

मराठी अध्यापनपध्दतीचा अध्यापक विषयतज्ञ व अध्यापनप्रवीण असावा. इतर भाषांचे तौलनिक ज्ञान असणारा हवा. ज्यांचा पूर्वी पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय नाही अशांना विशेष मार्गदर्शन करणारा हवा.

वरील सूचना संबंधित प्रशिक्षणार्थ्यांचा विचार करता उपयुक्त आहेत. वरील गोष्टीबाबतची सर्वसाधारण माहिती या पूर्वी (६.१५) (पृष्ठ क्रमांक १६१ ) नोंदविलेली आहे.

२) मराठी अध्यापनपध्दतीचा अभ्यासक्रम :

एका वर्षाच्या मानाने आटोपशीर व्हावा. विषयज्ञानात निवडक भाग असावा. विषयज्ञानाचा अती बोजा नसावा. तथापि ज्या प्रशिक्षणार्थ्यांचा पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय नाही अशा प्रशिक्षणार्थ्यांना हा अभ्यासक्रम आवश्यक आहे. २५ गुणांच्या मानाने हा अभ्यासक्रम व्यापक आहे ही बाब महत्वाची आहे. या गोष्टीबाबतची उपयुक्त अशी सर्वसाधारण माहिती पूर्वी : (६.१५) (पृष्ठ क्रमांक १४२ ) मध्ये नोंदविली आहे.

३) मराठी अध्यापनपध्दतीवर व्याख्याने :

विषयज्ञानांची व अनुभवी अध्यापकांची व्याख्याने मधून मधून हवीत. इतर कला महाविद्यालयांतील मराठीच्या अध्यापकांची विषयज्ञानावर भाषणे हवीत ही सूचना योग्य आहे.

या व्यतिरिक्त अन्य माहिती या ६.१५ (पृष्ठ १४२ ) मध्ये नोंदविलेली आहे.

४) मराठी अध्यापनपध्दती विषयक कृतिसत्रे :

मराठी भाषेच्या विविध उपघटकावर हवीत. कृतिसत्रांचे छापील सारांश प्रशिक्षणार्थ्यांना द्यावेत. विषयज्ञानाबाबत शंकानिरसन तात्काळ, सविस्तर करण्यासाठी भरपूर कृतिसत्रे हवीत. भाषिक सहलींद्वारा प्रत्यक्ष भाषाकार्य व्हावे.

वरील माहिती व्यतिरिक्त अन्य माहिती ६.१५ (पृष्ठ क्रमांक १४३) मध्ये नोंदविलेली आहे.

५) ग्रंथालय :

अ) संदर्भ ग्रंथ : मराठी वाङ्.मयावरही भरपूर हवेत. मराठी भाषा, शब्दकोष, ज्ञानकोष भरपूर हवेत. तौलनिक स्वरूपाचे भाषाध्यापन ग्रंथ भरपूर हवेत. जुने ग्रंथ भरपूर हवेत. हे प्रत्यक्ष वाचण्यास मिळावेत.

या व्यतिरिक्त अन्य माहिती ६.१५ (पृष्ठ क्रमांक १५३ ) मध्ये नोंदविलेली आहे.

ब) पाठ्यपुस्तके : पाठ्यपुस्तके आणि विषयज्ञान यांचा संबंध स्पष्ट करावा. सर्व नवी जुनी पाठ्यपुस्तके भरपूर हवीत. सर्व स्तरावरची पाठ्यपुस्तके हवीत. ही सूचना योग्य आहे.

या व्यतिरिक्तची अन्य माहिती ६.१५ (पृष्ठ क्रमांक १५४ ) मध्ये नोंदविलेली आहे.

६) दृक्-श्राव्य साधने :

मराठी अध्यापनपध्दती प्रभावीपणे समजण्यास सहाय्यभूत व्हावी, विषयज्ञान व अध्यापनतंत्राचे ज्ञान समजण्यासाठी त्यांचा वापर व्हावा व करू द्यावा, दृक्-श्राव्य साधनांनी प्रशिक्षणार्थीची भाषिक प्रगती व्हावी, ही सूचना योग्य आहे.

वरील माहिती व्यतिरिक्त अन्य माहिती ६.१५ (पृष्ठ क्रमांक १५४) मध्ये नोंदविलेली आहे.

७) महाविद्यालयीन वातावरण आणि
८) वर्गातील वातावरण

मराठीमय हवे. मराठीचा स्वतंत्र कक्ष असावा. साधनांनी समृध्द हवा. साहित्यिकांची चित्रे, संग्रहित वस्तू, यांनी मराठीस पोषक असे वातावरण निर्माण करावे ही सूचना योग्य आहे.

या व्यतिरिक्त अन्य माहिती ६.१५ (पृष्ठ क्रमांक १४५ ) मध्ये नोंदविलेली आहे.

९) मराठीची परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन :

दैनंदिन व वस्तुनिष्ठ मूल्यमापन हवे. प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यावर मूल्यमापनाच्यावेळी अन्याय होऊ नये. गुण आणि श्रेणी यांचा ताळमेळ हवा. तोंडी विषयज्ञान परीक्षा घ्यावी. विषयज्ञान चाचण्या वारंवार घ्याव्यात. विषयज्ञान स्पर्धा ठेवाव्यात त्याद्वारे प्रशिक्षणार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे. मूल्यमापन साधने योग्य रीतीने वापरावीत. या सूचना रास्त आहेत.

या व्यतिरिक्त अन्य माहिती ६.१५ (पृष्ठ क्रमांक १४८ ) मध्ये दिलेली आहे.

अन्य सुचविलेल्या गोष्टींपैकी स्वाध्याय, प्रस्तावना, विषयविवेचन स्पर्धा ठेवून सर्वोत्तम प्रशिक्षणार्थ्यास प्रशस्तिपत्रक द्यावे ही सूचना अभिनव आहे.

६.१६ <u>पाठटाचण करताना येणाऱ्या अडचणी</u> :

प्रश्नावलीच्या प्रश्न क्रमांक ७ मध्ये पाठटाचण करताना येणाऱ्या अडचणी दिलेल्या होत्या आणि सहमत असलेल्या अडचणींपुढे ( ✓ ) बरोबर अशी खूण करावयास सांगितलेली होती. सारणी क्र.(६.१८) मध्ये या प्रश्नाद्वारे मिळालेली माहिती नमूद केलेली आहे.

सारणी क्र. ६. १८

पाठटाचण करताना येणाऱ्या अडचणी

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या होय | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या नाही |
|---|---|---|---|
| १) | पाठटाचण अचूक कसे काढावे याचे व्यक्तिगत मार्गदर्शन अपुरे पडते. | ५१ | २७ |
| २) | विषयज्ञान अपुरे पडते. | ७५ | ३ |
| ३) | अवांतर वाचन कमी पडते. | ७५ | ३ |
| ४) | संदर्भ ग्रंथातील संदर्भ कोठून कसे शोधावेत ते कळत नाही, त्यांचा योग्य वापर कसा करावा हे कळत नाही. | ७४ | ४ |
| ५) | शालेय अव्यवस्थेमुळे पाठाचा घटक वेळेवर घेता येत नाही. | ५३ | २५ |
| ६) | मार्गदर्शकाची वेळेपूर्वी भेट होत नाही. | २८ | ५० |
| ७) | मार्गदर्शन गडबडीत उरकले जाते. | ४८ | ३० |
| ८) | पाठटाचणातील संज्ञा अर्धवट समजल्या जातात त्यांचे नीट आकलन होत नाही. | ६० | १८ |
| ९) | उपघटकाच्या नेमक्या स्वरूपाचा अंदाज येत नाही. | ६६ | १२ |
| १०) | विद्यार्थ्यांच्या पातळीचा प्रशिक्षणार्थ्यांना नीट अंदाज येत नाही. | ७२ | ६ |
| ११) | पाठटाचण कमी वेळेत पक्के करावे लागते. | ४७ | ३१ |
| १२) | व्याकरणाचे पाठटाचण सहज जमत नाही. | ७२ | ६ |
| १३) | भाषेचे बारकावे समजत नाहीत. | ७२ | ६ |
| १४) | शुध्दलेखनात चुका होतात. | ७२ | ५६ |

वरील सारणीतील (६.१८) मराठीच्या पाठाचे टाचण करताना उद्भवणाऱ्या अडचणींना छात्राध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादानुसार त्यांची उतरत्या श्रेणीनुसार पुनर्मांडणी करून त्या अडचणी पुन्हा पुढील सारणीत (६.१९) नमूद केल्या आहेत.

सारणी क्रमांक ६.१९

पाठटाचण करताना येणाऱ्या अडचणी
(प्रतिसादाच्या उतरत्या श्रेणीनुसार)

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या होय | नाही |
|---|---|---|---|
| १) | विषयज्ञान अपुरे पडते. | ७५ | ३ |
| २) | अवांतर वाचन कमी पडते. | ७५ | ३ |
| ३) | संदर्भ ग्रंथातील संदर्भ कोठून कसे शोधून काढावेत हे कळत नाही, त्यांचा योग्य वापर कसा करावा ते कळत नाही. | ७४ | ४ |
| ४) | विद्यार्थ्यांच्या पातळीचा प्रशिक्षणार्थ्यांना नीट अंदाज येत नाही. | ७२ | ६ |
| ५) | व्याकरणाचे पाठटाचण सहज जमत नाही. | ७२ | ६ |
| ६) | भाषेचे अ बारकावे समजत नाहीत. | ७२ | ६ |
| ७) | शुध्दलेखनात चुका होतात. | ७२ | ६ |
| ८) | उपघटकाच्या नेमक्या स्वरूपाचा अंदाज येत नाही. | ६६ | १२ |
| ९) | पाठटाचणातील संज्ञा अर्धवट समजल्या जातात त्यांचे नीट आकलन होत नाही. | ६० | १८ |
| १०) | शालेय अव्यवस्थेमुळे पाठाचा घटक वेळेवर घेता येत नाही. | ५३ | २५ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ११) | पाठटाचण अचूक कसे काढावें याचे व्यक्तिगत मार्गदर्शन अपुरे पडते. | ५१ | २७ |
| १२) | मार्गदर्शन गडबडीत उरकले जाते. | ४८ | ३० |
| १३) | पाठटाचण कमी वेळेत पक्के करावे लागते. | ४७ | ३१ |
| १४) | मार्गदर्शकाची वेळेपूर्वी भेट होत नाही. | २८ | ५० |

वरील सारणीत (६.१९) ज्या अडचणी दिलेल्या आहेत त्यापैकी अडचण क्रमांक १ - विषयज्ञान अपुरे पडते. अडचण क्रमांक २ - अवांतर वाचन कमी पडते. अडचण क्रमांक ३ - संदर्भ ग्रंथातील संदर्भ कोठून कसे शोधून काढावेत ते कळत नाही. त्यांचा योग्य वापर कसा करावा ते कळत नाही. अडचण क्रमांक ५ - व्याकरणाचे पाठटाचण सहज जमत नाही. अडचण क्रमांक ६ भाषेचे बारकावे समजत नाहीत, अडचण क्रमांक ७ - शुध्दलेखनात चुका होतात, अडचण क्रमांक ८ - उपघटकाच्या नेमक्या स्वरूपाचा अंदाज येत नाही. अडचण क्रमांक ९ - पाठटाचणातील संज्ञा अर्धवट समजल्या जातात, त्यांचे नीट आकलन होत नाही. अडचण क्रमांक ११ - पाठटाचण अचूक कसे काढावे याचे व्यक्तिगत मार्गदर्शन अपुरे पडते. वरील अडचणी शेकडा ५० टक्क्याहूनही अधिक प्रशिक्षणार्थ्यांना जाणवणाऱ्या आहेत. अडचण क्रमांक ४, १०, १२, १३, १४ या अडचणी सारणी क्रमांक (६.७)(पृ.१०९) मध्ये नमूद केल्या आहेत. कारण त्या मराठीच्या प्रशिक्षणार्थ्यांना सतत जाणवणाऱ्या आहेत.

याच प्रश्नाच्या उत्तरार्धात या व्यतिरिक्त आणखी काही अडचणी येत असल्यास त्या नमूद करावयास सांगितलेल्या होत्या. नमूद केलेल्या अडचणी पुढे नोंदविलेल्या आहेत.

१) विविध उपघटकांच्या टाचणांचे नमुने मिळत नाहीत.

२) मराठी विषय नसलेल्यांना विषयज्ञान व उच्च भाषा कळत नाहीत.

३) मार्गदर्शनाची संध्याकाळची वेळ थकव्यात भर घालते.

४) मुद्दा व उपमुद्दे यांची गुंफण नीट जमत नाही.

५) उपघटकाचे नेमके स्वरूप आणि पाठपाय-यांचे आकलन सूक्ष्म स्वरूपात नीट होत नाही.

या अडचणींबाबत उपायात्मक सूचना नमूद करावयास सांगितलेल्या होत्या. मिळालेल्या सूचना खाली नमूद केलेल्या आहेत :

१) विविध पाठनियोजन टाचणे घटवून घ्यावीत.

२) विषयज्ञान आणि अध्यापनतंत्र यांची सांगड घालावी.

३) प्राध्यापकांच्या कार्याची विभागणी व्हावी. मार्गदर्शन, अध्यापन, निरीक्षण निरनिराळ्या तज्ञ प्राध्यापकांकडे देऊन त्यांच्या कार्यात सुसंगती आणावी. एकाच प्राध्यापकावर सर्व कार्यांचा ताण नको.

४) प्राध्यापकांनी पाठटाचणाबाबत हट्टाग्रही भूमिका घेऊ नये. किंवा विसंगत शेरे मारून प्रशिक्षणार्थींना गोंधळात टाकू नये.

५) शुध्द लेखनासाठी प्रारंभीच खास प्रयोग हवेत. फलक लेखनाचे कौशल्य सूक्ष्म अध्यापन कृतिसत्रात घ्यावे.

६) मुद्दे कसे काढावेत ते शिकवावे.

७) टाचणात नावीण्य आणणाऱ्या कल्पनांचा स्वीकार व्हावा.

८) प्रशिक्षणार्थ्यांची संख्या आणि मार्गदर्शकांची संख्या योग्य प्रमाणात हवी.

९) तयारीशिवाय पाठ घेणाऱ्यांचे पाठ रद्द करावेत.

१०) मार्गदर्शन कार्य प्रसन्न उत्साही वातावरणात व्हावे. ते गडबडीत होऊ नये.

११) अध्यापन कसे करावे याचे , गरज पडल्यास वैयक्तिक मार्गदर्शन मिळावे.

वरील उपायांपैकी उपाय क्र. १, ३, ४, ७ हे उपाय विचारार्ह आहेत. या उपायांचा सम्यक् विचार ' निष्कर्ष आणि शिफारशी ' या प्रकरणात निष्कर्ष काढताना आणि शिफारशी करताना केलेला आहे.

सारणी क्र. ६.१९ मध्ये दिलेल्या पाठटाचणाबाबतच्या अडचणीशिवाय अन्य अडचणींपैकी अडचण क्र. २ - मराठी विषय नसलेल्यांना विषयज्ञान व उच्च भाषा कळत नाहीत. अडचण क्र. ४ - मुद्दा व उपमुद्दे यांची गुंफण नीट जमत नाही. या दोन अडचणी रास्त व योग्य आहेत.

अडचण क्र. १ - विविध उपघटकांच्या टाचणाचे नमुने मिळत नाहीत ही अडचण खरी नाही. विविध उपघटकांच्या टाचणाचे नमुने प्रशिक्षणार्थ्यांना मराठी अध्यापनपध्दतीवरच्या पाठयपुस्तकातून व अध्यापनपध्दतीच्या अध्ययनाच्यावेळी उपलब्ध होतात.

मार्गदर्शनाची संध्याकाळची वेळ थकव्यात भर घालते ही अडचण क्र. ३ खरी असली तरी संध्याकाळच्या वेळेशिवाय मार्गदर्शनास अन्य वेळ उपलब्ध होतोच असे नाही.

अडचण क्र. ५ - उपघटकाचे नेमके स्वरूप आणि पाठ पाय-यांचे आकलन सूक्ष्म स्वरूपात होत नाही. उपघटकाचे नेमके स्वरूप आणि पाठपाय-या सराव आणि अध्यापकांच्या सहाय्याने समजू शकतात.

वरील अडचणीवर सुचविलेल्या उपायांपैकी उपाय क्र. १ - विविध पाठ-नियोजन टाचणे घटकून घ्यावीत, उपाय क्र. २ विषयज्ञान आणि अध्यापनतंत्राची सांगड घालावी, उपाय क्र. ३ प्राध्यापकांच्या कार्याची योग्य विभागणी व्हावी, उपाय क्र. ४ प्राध्यापकांनी पाठटाचणाबाबत हट्टाग्रही भूमिका घेऊ नये किंवा विसंगत शेरे मारून प्रशिक्षणार्थ्यांना गोंधळात टाकू नये, उपाय क्र.७ टाचणात नावीन्य आणावयाच्या कल्पनांचा स्वीकार व्हावा आणि उपाय क्र. ८

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

प्रशिक्षणार्थ्यांची संख्या आणि मार्गदर्शकांची संख्या योग्य प्रमाणात हवी, हे सर्वच उपाय मान्य होण्यासारखे आहेत.

उपाय क्र. ५ शुध्दलेखनासाठी प्रारंभीच खास प्रयोग हवेत, फलक लेखनाचे कौशल्य सूक्ष्म अध्यापन कृतिसत्रात घ्यावे हे उपाय उल्लेखनीय आहेत.

उपाय क्र. ६ मुद्दे कसे काढावेत ते शिकवावे. मुद्दे कसे काढावेत हे महाविद्यालयीन स्तरावर कळले जावे.

उपाय क्र. १० मार्गदर्शन प्रसन्न, उत्साही वातावरणात व्हावे. ते गडबडीत होऊ नये. मार्गदर्शन गडबडीत होऊ नये हे खरे पण सदैव प्रसन्न वातावरण निर्वात वातावरण मार्गदर्शनाच्यावेळी असेलच असे नाही.

उपाय क्र. ९ तयारीशिवाय पाठ घेणाऱ्यांचे पाठ रद्द करावेत ही सूचना योग्यच आहे.

६.१७ <u>पाठ घेताना येणाऱ्या अडचणी</u> :

प्रश्नावलीच्या प्रश्न क्रमांक ८ मध्ये पाठ घेताना येणाऱ्या अडचणीपुढे ( ✓ ) बरोबर अशी सहमती दर्शक खूण करावयास सांगितली होती. या प्रश्नाद्वारे मिळालेली माहिती सारणी क्र. ६.२० मध्ये नमूद केलेली आहे.

सारणी क्र. ६.२०

पाठ घेताना येणाऱ्या अडचणी

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या होय | नाही |
|---|---|---|---|
| १) | पाठ्यांशाचे प्रकट वाचन प्रभावी करता येत नाही. | ३३ | ४५ |
| २) | शालेय अव्यवस्थेमुळे पाठ रद्द होतात. | ६१ | १७ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ३) | पाठ घेताना विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान अपुरे पडते. | ७३ | ५ |
| ४) | टाचणाप्रमाणे सर्वच सत्र लक्षात रहात नाही. | ७१ | ७ |
| ५) | इतर अभ्यासामुळे पाठतयारीवर परिणाम होतो. | ५० | २८ |
| ६) | पाठतयारीला प्रशिक्षणार्थ्यांना कमी वेळ मिळतो. | ५६ | २२ |
| ७) | विविध रचनांचे अध्यापनतंत्र नेमके अंमलात आणताना अडचण येते. | ७३ | ५ |
| ८) | विवेचनावर व प्रश्नावर अती भर येतो. | ५८ | २० |
| ९) | स्वतःचे विवेचन कौशल्य कमी पडते. | ६९ | ९ |
| १०) | विद्यार्थ्यांवर नियंत्रण रहात नाही. | ४२ | ३६ |
| ११) | विषय पकड ढिली होते. | ३४ | ४४ |
| १२) | पाठ वेळेपूर्वीच संपतो. | ५७ | २१ |
| १३) | पाठ वेळेत संपत नाही. | ५१ | २७ |
| १४) | पाठघटक अती संक्षिप्त असतो. | ६० | १८ |
| १५) | पाठघटक अती विस्तृत असतो. | ६२ | १६ |
| १६) | पाठ सरावाचा अभाव जाणवतो. | ७३ | ५ |
| १७) | पाठतंत्रावर प्रभुत्व नसल्याने आत्मविश्वास कमी असतो. | ६९ | ९ |
| १८) | विषयज्ञानाच्या अभावामुळे अध्यापनात सहजता येत नाही. | ७१ | ७ |
| १९) | पाठ घेताना आयत्यावेळी बदल करणे जमत नाही. | ६१ | १७ |
| २०) | पाठघटक शालेय अव्यवस्थेमुळे वेळेवर घेता येत नाहीत. | ३० | ४८ |

वरील सारणीतील (६.२०) पाठ घेताना येणा-या अडचणींना छात्राध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादानुसार त्यांची उतरत्या श्रेणीनुसार पुनर्मांडणी करून त्या अडचणी पुन्हा पुढील सारणीत ६.२१ नमूद केलेल्या आहेत.

सारणी क्र. ६.२१

पाठ घेताना येणा-या अडचणी (प्रतिसादानुसार उतरत्या श्रेणीनुसार)

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | पाठ घेताना विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान अपुरे पडते. | ७३ | ५ |
| २) | विविध रचनांचे अध्यापनतंत्र नेमके अंमलात आणताना अडचण येते. | ७३ | ५ |
| ३) | पाठसरावाचा अभाव जाणवतो. | ७३ | ५ |
| ४) | टाचणाप्रमाणे सर्वच सत्र लक्षात रहात नाही. | ७१ | ७ |
| ५) | विषयज्ञानाच्या अभावामुळे अध्यापनात सहजता येत नाही. | ७१ | ७ |
| ६) | पाठतंत्रावर प्रभुत्व नसल्याने आत्मविश्वास कमी पडतो. | ६९ | ९ |
| ७) | स्वत:चे विवेचन कौशल्य कमी पडते. | ६९ | ९ |
| ८) | पाठघटक अती विस्तृत असतो. | ६२ | १६ |
| ९) | शालेय अव्यवस्थेमुळे पाठ रद्द होतात. | ६१ | १७ |
| १०) | पाठ घेताना आयत्यावेळी बदल करणे जमत नाही. | ६१ | १७ |
| ११) | पाठघटक अती संक्षिप्त असतो. | ६० | १८ |

| अनुक्रम | अवघड अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १२) | विवेचनावर व प्रश्नावर अती भर येतो. | ५८ | २० |
| १३) | पाठ वेळेपूर्वीच संपतो. | ५७ | २१ |
| १४) | पाठतयारीला प्रशिक्षणार्थ्यांना कमी वेळ मिळतो. | ५६ | २२ |
| १५) | पाठ वेळेत संपत नाही. | ५१ | २७ |
| १६) | इतर अभ्यासामुळे पाठतयारीवर परिणाम होतो. | ५० | २८ |
| १७) | विद्यार्थ्यांवर नियंत्रण रहात नाही. | ४२ | ३६ |
| १८) | विषयक पकड ढिली होते. | ३४ | ४४ |
| १९) | पाठ्यांशाचे प्रकट वाचन प्रभावी करता येत नाही. | ३३ | ४५ |
| २०) | पाठघटक शालेय अव्यवस्थेमुळे वेळेवर घेता येत नाहीत. | ३० | ४८ |

वरील सारणीतील ६.२७ - मध्ये ज्या अडचणी दिलेल्या आहेत त्यापैकी अडचण क्र.१ - पाठ घेताना विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान अपुरे पडते, अडचण क्र. २ - विविध रचनांचे अध्यापन तंत्र नेमके अंमलात आणताना अडचण येते, अडचण क्र. ३ - पाठसरावाचा अभाव जाणवतो, अडचण क्र.४ - टाचणाप्रमाणे सर्वच सत्र लक्षात रहात नाही. अडचण क्र. ५ - विषयज्ञानाच्या अभावामुळे अध्यापनात सहजता येत नाही. अडचण क्र. ७ - स्वत:चे विवेचन कौशल्य कमी पडते. या अडचणी तसेच अडचण क्र. ६ आणि १८ पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय नसल्याने उद्भवलेल्या आहेत. अडचण क्रमांक १, २, ३, ४, , ८, ९, १०, ११ १२, १३, १४, १५, १६, १७, १९, २० या अडचणी सर्वच मराठी प्रशिक्षणार्थ्यांना

समान असल्याने त्यांचा उल्लेख पूर्वी सारणी क्रमांक ६.१ (पृष्ट क्रमांक ११४ ) मध्ये केलेला आहे.

याच प्रश्नाच्या उत्तरार्धात आणखी काही अडचणी येत असल्यास त्या नमूद करावयास सांगितलेल्या होत्या. नमूद झालेल्या अडचणी खाली मांडलेल्या आहेत :

१) वर्गात अध्यापन करताना गैरसोयी जाणवतात.
२) साधनांची कमतरता भासते.
३) निरीक्षक मध्येच हस्तक्षेप करून अध्यापनाची साखळी तोडतात.
४) पाठाच्यावेळी बाह्य स्थिती, प्रतिकूल हवामान निराशा निर्माण करते.
५) पाठ घेताना मुद्दे विसरतात त्यांचा क्रम सुटतो. शब्दमर्यादा जाणवते. स्पष्टीकरण, प्रश्न कौशल्य थिटें पडते.
६) अल्प प्रतिसादाने निरुत्साह येतो.
७) साधने वापरताना बोलणे, प्रश्न विचारणे दोन्हीही नीट जमत नाही.
८) विवेचन कसे करावे हे कळत नाही.

वरील अडचणीबाबत उपायात्मक सूचना नमूद करावयास सांगितलेल्या होत्या. नमूद झालेल्या सूचना खाली दिलेल्या आहेत.

१) अध्यापनाच्या तासिका वाढवाव्यात.
२) पाठसरावास अधिक वाव द्यावा.
३) अध्यापनात पूर्वनियोजन आणि पूर्वतयारीसाठी प्राध्यापकांना भरपूर वेळ मिळावा.
४) एकाच शाळेवर पाठ असावेत.
५) चुका तास संपल्यावर समजावून दिल्या जाव्यात.

६) प्रक्टिसिंग स्कूल्स वाढवावीत.

७) फार लांब सराव शाळा नकोत.

८) निरीक्षकांनी पाठटाचणात खाडाखोड करून ते बाद करू नये.

९) शेरा मारण्यापूर्वी पूर्ण सतत निरीक्षण करावे मग पूर्ण विचारांती शेरा मारावा.

१०) विषयज्ञान परिपूर्ण होण्यासाठी प्राध्यापकांकडून सतत उपयुक्त मार्गदर्शन व्हावे.

११) तंत्र आणि मंत्राचा समतोल राखायचा कसा हे स्पष्ट व्हावे.

१२) विद्यार्थ्यांची आकलन पातळी कशी ठरवावी हे ज्ञात होण्यास प्राध्यापकांकडून मदत व्हावी.

१३) प्रशिक्षणार्थ्यांनी प्राध्यापकांच्या उपयुक्त सूचनानुसार पाठ घेण्याची रंगीत तालीम घरी करावी.

१४) आयत्यावेळच्या सुट्यामुळे न होणारे पाठ पुन्हा नंतर घेतले जावेत.

प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यानुसार त्याच्या पाठाध्यापनाच्या प्रगतीसाठी तसेच त्यास विशेष मार्गदर्शन होण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांची संख्या वारेमाप वाढवू नये.

प्रशिक्षणार्थ्यांची पाठांतर, विषयज्ञान स्पर्धा ठेवावी.

वरील सर्व सूचनांचा विचार ` निष्कर्ष आणि शिफारशी ` या प्रकरणात निष्कर्ष काढताना आणि शिफारशी करताना केलेला आहे.

सारणी क्र. ६.२७ मध्ये सुचविलेल्या पाठ घेतानाच्या अडचणी व्यतिरिक्त सुचविलेल्या अन्य अडचणीपैकी अडचण क्र. ५ - पाठ घेताना मुद्दे विसरतात. त्यांचा क्रम सुटतो. शब्दमर्यादा जाणवते. स्पष्टीकरण, प्रश्न कौशल्य थिटे पडते, अडचण क्र. ८ - विवेचन करावे ते नीट कळत नाही, या अडचणी पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय नसल्याने उद्भवतात.

अडचण क्र. १ - वर्गात अध्यापन करताना गैरसोयी जाणवतात, अडचण क्र. २ - साधनांची कमतरता भासते, अडचण क्र. ३ - निरीक्षक मध्येच हस्तक्षेप करून अध्यापनाची साखळी तोडतात, अडचण क्र. ४ पाठाच्यावेळी बाह्य स्थिती प्रतिकूल हवामान, निराशा निर्माण करते, अडचण क्र. ७ - साधने वापरताना बोलणे, प्रश्न विचारणे दोन्हीही नीट जमत नाही या अडचणी रास्त व योग्य आहेत.

अडचण क्र. ६ - अल्प प्रतिसादाने निरूत्साह येतो पण प्रतिसाद घेणे हे कौशल्य अध्यापकाने आत्मसात करावे लागते सबब ही अडचण समर्थनीय नाही.

या अडचणीवर सुचविलेल्या उपायांपैकी उपाय क्र. १ पाठसरावास अधिक वाव द्यावा, उपाय क्र. ४ चुका तास संपल्यावर समजावून दिल्या जाव्यात, उपाय क्र. ५ प्रॅक्टिसिंग स्कूलस वाढवावीत, उपाय क्र.६ फार लांब सराव शाळा नकोत, उपाय क्र.७ निरीक्षकांनी पाठटाचणात खाडाखोड करून ते बाद करू नये, उपाय क्र. ८ शेरा मारण्यापूर्वी पूर्ण सतत निरीक्षण करावे, मग पूर्ण विचारांती शेरा मारावा, उपाय क्र. ९ विषयज्ञान परिपूर्ण होण्यासाठी प्राध्यापकांकडून सतत उपयुक्त मार्गदर्शन व्हावे हे सर्वच उपाय उपयुक्त आहेत.

उपाय क्र. १० - तंत्र आणि मंत्राचा समतोल कसा राखायचा हे स्पष्ट व्हावे. तंत्र आणि मंत्राचा समतोल हा सरावाचा भाग आहे आणि सरावाने हे साधावे.

उपाय क्र. ११ - विद्यार्थ्यांची आकलनपातळी कशी ठरवावी हे ज्ञात होण्यासाठी प्राध्यापकांकडून मदत व्हावी, विद्यार्थ्यांची आकलन पातळी प्रशिक्षणार्थ्यांना पाठ घेताना सरावाने येऊ शकते.

उपाय क्र. १२ - प्रशिक्षणार्थ्यांनी प्राध्यापकांच्या उपयुक्त सूचनांनुसार पाठ घेण्याची रंगीत तालीम घरी करावी हा उपाय प्रशिक्षणार्थ्यांच्या वैयक्तिक तयारीबाबतचा आहे.

उपाय क्र. १३ - आयत्यावेळच्या सुट्टयामुळे न होणारे पाठ पुन्हा नंतर घेतले जावेत ही सूचना सर्वसामान्य आहे.

६.१८ मराठीचा पाठ निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी :

प्रश्नावलीच्या प्रश्न क्रमांक ९ मध्ये मराठीचा पाठ निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी दिलेल्या होत्या आणि सहमत अडचणीपुढे (✓) बरोबर अशी खूण करावयास सांगितली होती. ह्या प्रश्नाद्वारे मिळालेली माहिती सारणी क्र. ६.१२ मध्ये नमूद केलेली आहे.

सारणी क्र. ६.१३

मराठी पाठनिरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थींची संख्या होय | नाही |
|---|---|---|---|
| १) | मराठी हा प्रमुख विषय पूर्वी नसल्याने विषय व पाठ्यांश ज्ञानाच्या कमतरतेमुळे त्रुटी दाखविता येत नाहीत. | ६१ | १७ |
| २) | पाठ घेणाऱ्याने केलेले विवेचन कितपत बरोबर याची खात्री देता येत नाही. | ७० | ८ |
| ३) | पाठातील बारकावे कळत नाहीत. | ७० | ८ |
| ४) | मराठीचे सूक्ष्म विशेष समजत नाहीत. | ६८ | १० |
| ५) | विषयज्ञान पाठ्यांशज्ञान सविस्तर नसल्याने केवळ तंत्रावरच निरीक्षणात भर दिला जातो. | ७२ | ६ |
| ६) | विषयाच्या त्रोटक ज्ञानामुळे निरीक्षण बरोबर व दर्जेदार होत नाही. | ६८ | १० |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ७) | वर्ग नियंत्रण न झाल्याने निरीक्षणात अडथळा येतो. | ४८ | ३० |
| ८) | निरीक्षणात संपूर्ण वस्तुनिष्ठता येत नसल्याने अचूक मूल्यमापन करता येत नाही. | ७२ | ६ |

वरील सारणीतील (६.१२) मराठीच्या पाठाचे निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणींना छात्राध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादानुसार त्यांची उतरत्या श्रेणीनुसार पुर्नमांडणी करून त्या अडचणी सारणी क्र. ६.१३ मध्ये नमूद केल्या आहेत.

सारणी क्र. ६.१३

मराठीचा पाठ निरीक्षण करताना येणाऱ्या अडचणी (प्रतिसादानुसार उतरत्या श्रेणीनुसार)

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| १) | विषयज्ञान व पाठ्यांशज्ञान सविस्तर नसल्याने केवळ तंत्रावरच निरीक्षणात भर दिला जातो. | ७२ | ६ |
| २) | निरीक्षणात संपूर्ण वस्तुनिष्ठता येत नसल्याने अचूक मूल्यमापन करता येत नाही. | ७२ | ६ |
| ३) | पाठ घेणाऱ्याने केलेले विवेचन कितपत बरोबर याची खात्री देता येत नाही. | ७० | ८ |
| ४) | पाठातील बारकावे कळत नाहीत. | ७० | ८ |

| अनुक्रम | अडचणींची विधाने | प्रशिक्षणार्थ्यांची संख्या | |
|---|---|---|---|
| | | होय | नाही |
| ५) | मराठीचे सूक्ष्म विशेष समजत नाहीत. | ६८ | १० |
| ६) | विषयाच्या त्रोटक ज्ञानामुळे निरीक्षण बरोबर व दर्जेदार होत नाही. | ६८ | १० |
| ७) | मराठी हा प्रमुख विषय पूर्वी नसल्याने विषय व पाठ्यांश ज्ञानाच्या कमतरतेमुळे त्रुटी दाखविता येत नाहीत. | ६१ | १७ |
| ८) | वर्ग नियंत्रण न झाल्याने निरीक्षणात अडथळा येतो. | ४८ | ३० |

वरील सारणीतील (६.२३) मध्ये ज्या अडचणी दिलेल्या आहेत त्यापैकी अडचण क्र. १ - विषयज्ञान व पाठ्यांशज्ञान सविस्तर नसल्याने केवळ तंत्रावरच निरीक्षणात भर दिला जातो. अडचण क्र. ३ - पाठ घेणाऱ्याने केलेले विवेचन कितपत बरोबर याची खात्री देता येत नाही. अडचण क्र. ४ - पाठातील बारकावे कळत नाहीत, अडचण क्र. ५ - मराठीचे सूक्ष्म विशेष समजत नाहीत. अडचण क्र. ६ - विषयाच्या त्रोटक ज्ञानामुळे निरीक्षण बरोबर व दर्जेदार होत नाही. अडचण क्रमांक ७ - मराठी हा प्रमुख विषय पूर्वी नसल्याने विषय वा पाठ्यांश ज्ञानाच्या कमतरतेमुळे त्रुटी दाखविता येत नाहीत.

वरील अडचणी पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस मराठी मुख्य विषय नसल्यामुळे सदरच्या प्रशिक्षणार्थ्यांनाच जाणवतात पण अडचण क्र.२ व अडचण क्र. ८ या मराठीच्या सर्वच प्रशिक्षणार्थ्यांना समान असल्याने त्यांचा उल्लेख ६.११ या सारणीत केलेला आहे. (पृ.११७)

याच प्रश्नाच्या उत्तरार्धात पाठाचे निरीक्षण करताना आणखी काही अडचणी येत असल्यास त्या नमूद करावयास सांगितलेल्या होत्या. नमूद झालेल्या अडचणी पुढे दिलेल्या आहेत.

१) निरीक्षणात पाठाचे निरीक्षण नीट जमत नाही.

२) व्याकरण पाठाचे निरीक्षण नीट जमत नाही.

३) घटकाचे अंतरंग नीट ज्ञात नसल्याने निरीक्षण सर्वांगपरिपूर्ण होत नाही.

४) निरीक्षकास घटक ज्ञान सूक्ष्म असतेच असे नाही.

५) पाठ निरीक्षण करताना बाधक गैरसोयी जास्त असतात.

६) नोंद आणि निरीक्षण एकाचवेळी नीट करता येत नाही.

७) पाठटाचणाप्रमाणे पाठ होतो की नाही ते निरीक्षक प्रशिक्षणार्थ्यांस कळत नाही.

८) निरीक्षण कोणकोणत्या बाबींचे कसे करावे ते कळत नाही.

९) निरीक्षक प्राध्यापक समोर बसून मध्येच तोंडी शेरे मारून निरुत्साहित करतात. निरीक्षक प्रोत्साहक नसतात.

१०) सूचनानंतर समजावून दिल्या जात नाहीत.

११) शाळेच्या शिक्षिका निरीक्षण करत नाहीत. उपयुक्त सूचना देत नाहीत.

१२) निरीक्षणापूर्वी निरीक्षणाची सखोल तंत्र माहिती ज्ञात नसते.

१३) प्रत्येक बाबीकडे बारीक सारीक लक्ष देणे अवघड वाटते.

१४) गोंगाटाने निरीक्षणात व्यत्यय येतो.

१५) निरीक्षकाच्या मनात अध्यापक विद्यार्थी विस्कळित अध्यापनाने गोंधळ निर्माण करतो.

१६) निरीक्षणाची नजर येणे ही बाब अवघड वाटते.

१७) कसे निरीक्षण करावे याचे आवश्यक तेवढे मार्गदर्शन होत नाही.

या अडचणीबाबत उपायात्मक सूचना नमूद करावयास सांगितलेल्या होत्या. प्राप्त सूचना खाली मांडलेल्या आहेत.

१) निरीक्षकांनी पाठातील चुका पाठानंतर अवश्य समजावून सांगाव्यात.
२) निरीक्षणोत्तर चर्चा सर्वांमध्ये व्हावी.
३) निरीक्षण बारकाईचे, वस्तुनिष्ठ, प्रोत्साहक हवे.
४) निरीक्षणाच्या कलातंत्रावर भर द्यावा.
५) उत्तम निरीक्षणाच्या नवीन सूचना स्वीकाराव्यात.
६) उत्तम निरीक्षणाचे प्रात्यक्षिक व्हावे.
७) निरीक्षणीय मुद्दे अगोदर स्पष्ट व्हावेत.
८) आदर्श निरीक्षणाचे मार्गदर्शन हवे.
९) निरीक्षणासाठी संबंधित शाळेतील विषय शिक्षक हजर रहावेत.
१०) अनेकांकडून निरीक्षण होणे हे उपयुक्त ठरते.

सारणी क्र. ६.२३ मध्ये दिलेल्या अडचणीशिवाय अन्य अडचणीपैकी अडचण क्र. १ - निरीक्षणात पाठाचे निरीक्षण नीट जमत नाही. अडचण क्र. ३ घटकांचे अंतरंग नीट ज्ञात नसल्याने निरीक्षण सर्वांगपरिपूर्ण होत नाही, अडचण क्र.५ पाठनिरीक्षण करताना बाधक गैरसोयी जास्त असतात, निरीक्षण साधनांचा अचूक वापर होत नाही, अडचण क्र. ६ - नोंद आणि निरीक्षण एकाच वेळी नीट करता येत नाही, अडचण क्र. ७ - पाठ टाचणाप्रमाणे पाठ होतो की नाही ते निरीक्षक प्रशिक्षणार्थ्यांस कळत नाही, अडचण क्र. ८ - निरीक्षण कोणकोणत्या बाबींचे कसे करावे ते कळत नाही, अडचण क्र. ९ - निरीक्षक प्राध्यापक समोर बसून मध्येच तोंडी शेरे मारून निरुत्साहित करतात, अडचण क्र. १० - सूचना नंतर समजावून दिल्या जात नाहीत, अडचण क्र. ११ - शाळेच्या शिक्षिका निरीक्षण करत नाहीत, अडचण क्र. १३ - प्रत्येक बाबींकडे बारीकसारीक लक्ष देणे अवघड वाटते, अडचण क्र. १४ - गोंगाटाने निरीक्षणात व्यत्यय येतो, अडचण क्र. १७ - कसे निरीक्षण करावे याचे आवश्यक तेवढे मार्गदर्शन होत नाही या सर्व अडचणी रास्त व योग्य आहेत.

अडचण क्र. ३ - व्याकरण पाठाचे निरीक्षण नीट जमत नाही, अडचण क्र. ४ - निरीक्षकास घटकाचे सूक्ष्म ज्ञान असतेच असे नाही. वरील अडचणी मराठी विषय पदवी आणि पदव्युत्तर परीक्षेस न घेतल्यामुळे उद्भवलेल्या आहेत.

अडचण क्र. १२ - निरीक्षणापूर्वी निरीक्षणाची सखोल माहिती नसते, अडचण क्र. १६ - निरीक्षणाची नजर येणे ही बाब अवघड वाटते. वरील अडचणी निरीक्षण तंत्र नीट समजावून न दिल्याने उद्भवतात. सबब प्रशिक्षणार्थ्यांना निरीक्षण तंत्र नीट समजावून द्यावे.

अडचण क्र. १५ - निरीक्षकाच्या मनात अध्यापक विद्यार्थी विस्कळित अध्यापनाने गोंधळ निर्माण करतो. विस्कळित अध्यापनाबाबत निरीक्षकाने गोंधळून निरीक्षण करू नये. विस्कळित अध्यापन व निरीक्षण यांचा संबंध नाही.

वरील अडचणींबाबत जे उपाय सुचविले आहेत त्यापैकी उपाय क्र. १ - निरीक्षकांनी पाठातील चुका पाठानंतर अवश्य समजावून सांगाव्यात, उपाय क्र.२ - निरीक्षणोत्तर चर्चा सर्वांमध्ये व्हावी, उपाय क्र. ३ - निरीक्षण बारकाईचे, वस्तुनिष्ठ, प्रोत्साहक हवे, उपाय क्र. ५ - उत्तम निरीक्षणाच्या नवीन सूचना स्वीकाराव्यात, उपाय क्र. ६ - उत्तम निरीक्षणाचे प्रात्यक्षिक व्हावे, उपाय क्र. ७ - निरीक्षणीय मुद्दे अगोदर स्पष्ट हवेत, उपाय क्र. ८ - आदर्श निरीक्षणाबाबत मार्गदर्शन हवे, उपाय क्र. ९ - निरीक्षणासाठी संबंधित शाळेतील त्या वर्गाचे विषय शिक्षक हजर रहावेत, उपाय क्र. १० - अनेकांकडून निरीक्षण होणे हे उपयुक्त ठरते हे सर्वच उपाय योग्य व रास्त आहेत. उपयुक्त आहेत.

६.१९ <u>प्रस्तुत संशोधनास उपयुक्त अशी अन्य माहिती</u> :

प्रश्न क्रमांक १० मध्ये प्रस्तुत संशोधनास उपयुक्त होईल अशी अन्य संबंधित माहिती देण्यास सांगितलेली होती. प्राप्त माहिती खाली दिलेली आहे.

१) मराठीच्या अध्यापकांनी मराठी अध्यापनपध्दतीच्या समस्यांवर संबंधित संशोधन करावे.

२) निरनिराळी कात्रणे अध्यापनात उपयोजावीत.

३) मराठी मुख्य विषय नसलेल्यांची हेटाळणी केली जाऊ नये, उलट त्यांना प्रोत्साहन द्यावे.

४) प्रशिक्षणाचा कालावधी वाढवावा.

५) पाठयतंत्र जखडबंद असू नये.

६) प्रशिक्षणार्थ्यांचा प्राध्यापकांनी भर वर्गात अपमान करू नये.

७) प्रशिक्षक शिकवित असताना निरीक्षकांनी आपापसात गप्पा मारू नयेत आणि प्रशिक्षकाचे लक्ष अध्यापनापासून विचलित करू नये. पाठ पडला तरी धीर द्यावा, पाठ चांगला झाला तर प्रोत्साहन द्यावे. आवश्यक वेळीच अत्यल्प हस्तक्षेप करावा.

वरील सुचनांपैकी सूचना क्र. १ नुसार मराठी अध्यापनपध्दतीच्या समस्याबाबत संशोधन झाल्यास ते संबंधितांना उपयुक्त ठरेल, सूचना क्र. २ - कात्रणांद्वारे अध्यापन व्हावे ही सूचना अभिनव आहे, सूचना क्र. ३ - मराठी मुख्य विषय नसलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या मनातील मराठीबद्दलची भीती घालवून त्यांना प्रोत्साहन द्यावे ही सूचना महत्वाची आहे, सूचना क्र. ६ व ७ - पाठ निरीक्षणाबाबत आहेत आणि त्या निरीक्षणाच्याबाबत सर्वसामान्य स्वरूपाच्या आहेत.

## ६.२० समारोप :

या प्रकरणामध्ये ` ब ` विभागात मराठी विषय पदवी आणि-किंवा पदव्युत्तर परीक्षेस मुख्य स्वरूपात न घेतलेल्या आणि बी.एड्. परीक्षेसाठी ` मराठी अध्यापनपध्दती ` निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या समस्यांचे वर्गीकरण, विश्लेषण करून अन्वयार्थ लावला आहे. पुढील प्रकरण ७ मध्ये (निष्कर्ष आणि शिफारशी) प्रकरण क्रमांक ५ आणि ६ मध्ये लावलेल्या अन्वयार्थाच्या आधारावर निष्कर्ष काढलेले आहेत आणि शिफारशी केलेल्या आहेत.